पुणे, किशोर– वर्ष ५२, अंक ४ था, एप्रिल २०२३, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 52, Issue- 4, April 2023 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

एप्रिल २०२३



# भीमराव

*आकाशाचे नवे नाव भीमराव*
*प्रकाशाचे नवे गाव भीमराव*

*शिक्षणाची नवी वाट भीमराव*
*सागराची नवी लाट भीमराव*

*माणसांचे नवे बेट भीमराव*
*आभाळाच्या वर थेट भीमराव*

*मातीतला अभिमान भीमराव*
*तुझा माझा स्वाभिमान भीमराव*

*राष्ट्रप्रेम राष्ट्रभक्ती भीमराव*
*एकतेची खरी शक्ती भीमराव*

*समतेचे राष्ट्र गान भीमराव*
*बंधुत्वाचे देई भान भीमराव*

*तिरंग्याची तुम्ही शान भीमराव*
*भारताचे संविधान भीमराव*



विलास मोरे
संपर्क : ७५८८००७८६६

# किशोर

एप्रिल २०२३, वर्ष ५२ वे, अंक ४ था, चैत्र-वैशाख, शके १९४५







**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

निर्मिती अधिकारी : हेमंत बाबर

अक्षरजुळणी : किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

वितरण व्यवस्थापक
जालिंदर पाटील

मुखपृष्ठ : प्रा. रवि पवार
संपर्क : ९८८१०९११९५

चित्रांकन : श्रीनिवास प्रभुदेसाई, घनश्याम देशमुख, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अंबिका करंदीकर, अजय विभुते, योगिता धोटे, माईंडइट संवाद, जैत्र डिजिटल, अमृता ढगे, अक्षदा जोशी


## अंतरंग






- भीमराव ........ *विलास मोरे* ........ ०२
- बुद्धिबळातील प्राण्यांचे बंड ! ........ *नरेंद्र कुळकर्णी* ........ ०६
- आठवणीतल्या फुलपाखरा.. ........ *दिलीप धायगुडे* ........ ११
- रामभरोसे 'अशुभ बोल्या' ........ *श्रीकांत बोजेवार* ........ १२
- शिक्षा ........ *सती भावे- हाल* ........ १६
- मी एक दुर्ग बोलतोय ........ *देविदास सौदागर* ........ १९
- कालगणना ........ *शशिकांत काळे* ........ २०
- झाडं लावणारी मुलं ........ *गणेश आघाव* ........ २३
- पिवळा पतंग ........ *कल्पना दुधाळ* ........ २४
- गणिताचा गमतीदार मॉर्निंग वॉक ........ *श्रीनिवास प्रभुदेसाई* ........ २७
- वाफेच्या शक्तीचा शोध ........ *नंदकिशोर शुक्ल* ........ २८
- देत रहा ........ *विवेक पाथुडकर* ........ २९
- आपला आपला मार्ग ..! ........ *मनोज बोरगावकर* ........ ३०
- आई- बाबा ........ *सुभाष कवडे* ........ ३३
- सद्गुणी बाळ ........ *लीला शिंदे* ........ ३४
- कुतूहल ........ *अमित डहाणे* ........ ३८

**बालविभाग**

- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा ........ ४२
- चित्रकथा : पाठलाग ........ *घनश्याम देशमुख* ........ ४४
- आम्ही सगळे वाचक ........ *अशोक कोतवाल* ........ ४६

**ENGLISH SECTION**

- Gratitude ........ *Aaditya Bartakke* ........ ४७
- The Golden Shoes ........ *Umashankar Devadhe* ........ ४८
- Funny Puzzle ........ *Ghanshyam Deshmukh* ........ ५०





ऑनलाइन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७ वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४ ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in




सुंदर नि मजेदार चित्रे
वाचनीय असा किशोर
वाट पाहते महिनाभर
घरातले इवलेसेही पोर

ओढ वाचनाची आम्हां
किशोरने अशी लावली
बालक असो आजोबा
दिशा साक्षरतेची दाखवली

मनमोहक असे मुखपृष्ठ
नेहमीच सर्वांना आवडते
घरी एकत्र बसून वाचण्या
मी किशोरलाच निवडते

एकाग्रतेने वाचून आम्ही
मासिक संग्रहीच ठेवतो
हातात पडताच किशोर
वय विसरायला लावतो

जंगलातले सर्व पशुपक्षी
किशोरनेच बोलके केले
सांगून थोरांची महतीही
इतिहासातच घेऊन गेले

आजी आजोबांच्या कथा
करतात मुलांवर संस्कार
आजीच्या बटव्यांमुळेच
पळून जातात ते विकार

हलक्या फुलक्या कथा
इवल्यांची गंमत गाणी
पाखरांच्या पंखावरून
घेऊन जाती वनी रानी

नानाविविध विषयांची
असते मासिकात रंगत
ज्ञानवर्धन करता करता
बसते जेवणाची पंगत

किशोरमुळे मिळतोय
बुद्धिलाच खुराक छान
हास्य भूत विज्ञानकथा
वाचतोय पानं न् पान

सौ. भारती सावंत
संपर्क : ९६५३४४५८३५

# परीक्षेशी दोस्ती

हितगुज

किशोर मित्र मैत्रिणींनो,

एप्रिल महिना म्हणजे परीक्षांचा हंगामच जणू. तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, लेखी परीक्षा अशा एकामागोमाग येणाऱ्या परीक्षा कधी एकदाच्या संपतील आणि आपली सुटका होईल, कधी एकदाची सुट्टी लागेल याच्या मनोमन कल्पना देखील तुमच्यापैकी अनेक जण याच महिन्यात करतात. एप्रिल महिन्यातच अनेकांना एकाच वेळी परीक्षेची आणि सुट्टीची स्वप्ने पडतात. आता तुम्ही मनोमन कल्पना करत आहात किंवा स्वप्न पाहत आहातच तर, अशी कल्पना करा की तुमची परीक्षा सुरू झाली आहे. परीक्षेचा पहिलाच दिवस आहे. मराठी विषयाचा पेपर आहे. पेपरमध्ये निबंधाचा विषय दिला आहे "परीक्षा नसत्या तर..."

निबंधाचा विषय वाचूनच तुमच्यापैकी अनेकांना आनंद होईल ना? तुम्ही अगदी आवडीने, मन लावून निबंध लिहाल ना ? तुमच्यापैकी काही जण तर घरून ज्या निबंधाच्या विषयाची तयारी करून आले आहेत ते सुद्धा तयारीचा विषय बाजूला सारून "परीक्षा नसत्या तर?" या आवडीच्या विषयावर निबंध लिहायला पुढे सरसावतील. अनेकांचे हात आपल्या आवडीचा निबंध लिहिण्यासाठी फुरफुरू लागतील. आता लिहून दाखवतोच असा तुमचा आवेश असेल. जणू फुल टॉस किंवा नो बॉल वर तुम्हांला फ्री हिट मिळाली आहे. आता एकदम सिक्सरच ! म्हणजे पहा आपल्या आवडीचे काम आपण किती मनापासून आणि उत्साहाने करतो की नाही? अगदी पेपर सुरू असताना देखील तुम्ही हसताय, कुठलेही टेन्शन न घेता निबंध लिहिताय म्हणजे भारीच की !


आता एक प्रश्न विचारतो. परीक्षा, परीक्षा म्हणतात ती नेमकी काय आहे? परीक्षा म्हणजे बागुलबुवा? परीक्षा म्हणजे पोटात गोळा? की परीक्षा म्हणजे पाठांतराच्या माळा? खरं सांगू, यापैकी एकही नाही आपण वर्गात जे शिकलो आहोत ते आपल्याला नीट समजले आहे की नाही याची चाचणी, टेस्ट म्हणजे परीक्षा. विराट कोहली जसा नेट प्रॅक्टिस करून क्रिकेट मॅचमध्ये खेळतो ना तसे अगदी. त्याचा सराव चांगला झाला असेल तर तो मॅचमध्ये छान खेळतो. चांगली फिल्डिंग करतो. प्रत्येक मॅच म्हणजे त्याची परीक्षाच असते. कधी कधी खूप सराव करून देखील तो लवकर आऊट होतो पण तो पुन्हा अभ्यास करून खेळतो. तो फास्ट बॉल, बाउन्सर, यॉर्कर, गुगली, कॅरम बॉल, दुसरा अशा अनेक कठीण कठीण बॉलचा ध्यानपूर्वक सराव करतो. तुमच्या परीक्षेत देखील असेच प्रश्न विचारतात ना? विराट परीक्षेला नाही म्हणत नाही. घाबरत नाही. उलट मॅचचा आनंद घेत असतो. मैदानात नाचत असतो, गात असतो. आपल्याला पण परीक्षेचा असाच आनंद घेता आला पाहिजे. त्याकरिता आपल्याला आपला आत्मविश्वास वाढवता आला पाहिजे. आणि हा आत्मविश्वास वाढवायचा असेल तर अभ्यासाचा चांगला सराव करत करत त्याच्याशी गट्टी केली पाहिजे, इतकी मनापासून की अभ्यास हा देखील आपला आवडता दोस्त व्हायला हवा. आणि दोस्ताला कोणी घाबरतं का? करा मग परीक्षेशी फ्रेंडशिप...

तुम्हांला परीक्षेबरोबरच्या दोस्तीसाठी खूप साऱ्या शुभेच्छा.

**– किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक



नरेंद्र कुळकर्णी



# बुद्धिबळातील प्राण्यांचे बंड !

जगातल्या दोघा बलाढ्य बुद्धिबळपटूंमध्ये जगज्जेतेपदासाठी सामना ठरला होता. शहराच्या बाहेर पिकनिकसाठी एक खूप मोठे निसर्गरम्य ठिकाण होते. खूप झाडे होती. पोहण्याचे तलाव होते. राहण्याची उत्तम सोय होती. मोठा सुंदर हॉल होता. शांत ठिकाण होते. येथेच हा मोठा बुद्धिबळ सामना ठरला होता. या पिकनिक स्पॉटपासून जवळच मोठे जंगल सुरू होत होते.

सामन्याची सारी तयारी आदल्याच दिवशी उशिरा पूर्ण झाली होती. खेळाचे जाणकार प्रेक्षक, मोठमोठे बुद्धिबळपटू, पत्रकार यांचे स्पर्धेसाठी शहरात आगमन झाले होते. संध्याकाळी पाच वाजता पहिला डाव सुरू होणार होता. हॉलच्या आकर्षक स्टेजवर दोघा बुद्धिबळपटूंसाठी खास तयार केलेली दोन भारी आसने ठेवली होती. त्यांच्या मध्ये मोठे भक्कम बनावटीचे टेबल बसवले होते. त्यावर बुद्धिबळाचा उंची पट आणि पटावर मोहरे मांडलेले होती.

या साऱ्या पूर्वतयारीची पाहणी करण्यासाठी सकाळी अधिकारी मंडळी हॉलमध्ये शिरली. स्टेजवर जाऊन पाहतात तो काय, मोठाच धक्का बसला त्यांना. कारण पटावरचे हत्ती, घोडे आणि उंट गायब होते. लागलीच शोधाशोध सुरू झाली. पण काही केल्या हे प्राणी सापडण्याचे नाव नव्हते. "हे किमती अश्व, गज आणि सांडणी चोरीला गेले असावेत," असा पोलिसांचा होरा झाला. म्हणजे पोलिसांचे प्रमुख या भाषेत बोलले. म्हणजे घोडे, हत्ती, उंट असे न म्हणता अश्व, गज, सांडणी असे उंची शब्द उच्चारले, की प्रकरण भारी वाटते, लोकांचे डोळे मोठे होतात. मग आपण उत्तम तपास अधिकारी आहोत, असे सर्वांना वाटते, असे त्या पोलिस साहेबांना वाटे. कौतुकाने ते मोठ्याने हसले. पण लगेच गंभीर होत गरजले, "या वनचरांना चोरणाऱ्यांची आता खैर नाही!"

खरी गोष्ट वेगळीच होती. 'आता या माणसांची चाकरी नको,' असा घोर निश्चय करून ही पटावरची मंडळी भर रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत जंगलाच्या दिशेने केव्हाच पसार झाली होती.

"आपली सारी पिढीच बंदिवान झाली यार!" घोडा बोलला. त्याला व इतर घोड्यांना चालणे मुश्कील होत होते. सरळ दोन पावले चालले, की ते डावीकडे वा उजवीकडे जाऊ लागायचे. त्यांना वाटेवर आणताना इतरांचे हाल होत होते. कारण उंट आणि हत्ती यांनाही चालीची अडचण होतीच की. उंटांचे पाय तिरक्या दिशेला पडत आणि हत्ती अगदी सरळसोट चालत. आपल्या जंगल पूर्वजांच्या सवयींशी जुळवून घेणे तसे सोपे नव्हतेच त्यांना.

"अरे अरे ते बघ, तिकडं गेलं ते लांब तिरमिरत. पकडा त्याला, धावा.." वाटसरू बोलला. एक उंट भलतीकडेच तिरक्या टांगा टाकत दूर चालला होता. अखेर त्याला दुसऱ्या उंटानेच रोखले.

हो, वाटसरूबद्दल सांगायचे राहिलेच. पटावरील चार-चार घोडे, उंट, हत्ती अशा बारा जणांच्या या गटाला वाटेत मध्येच घोंगडे पांघरलेला एक बुटका वाटसरू भेटला होता. तो जंगलामधील निवासी होता. एका घोड्याचा विरोध न जुमानता हत्ती-उंटांनी त्यास आपल्या सोबतीस राहा म्हणून म्हटले होते. घोड्याचा माणसावर विश्वास नव्हता, तरीही अखेरीस त्याने त्या माणसावर विश्वास ठेवायची इतरांची इच्छा मानली.

खरे तर या मोहिमेचे नेतेपण या घोड्याकडेच होते. त्याच्या चाली विचारपूर्वक होत्या. मोठमोठ्या



बुद्धिबळपटूंच्या हाताखाली चाली खेळताना त्याला खरोखरचे शहाणपण प्राप्त झाले होते. तेवढ्यात दुरून येणारा खिंकाळण्याचा आवाज कानांवर आल्याने त्याने सर्वांना शांत केले. मग त्या आवाजास त्याने प्रतिसाद दिला. हळूहळू खिंकाळण्याचा, घुरघुरण्याचा आणि गर्जण्याचा असे आवाज जवळ येऊ लागले. जंगलनिवासी घोडे, उंट आणि हत्तींचा एक मोठ्ठा कळपच त्यांना सामोरा आला. बुद्धिबळातील बंदी घोडा आणि जंगली घोडा एकमेकांना सामोरे गेले आणि एकमेकांची

तोंडे घासून त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. मग या दोन घोड्यांनी आठवड्यापूर्वीच केलेली ही गुप्त योजना सर्वांना कथन केली. सर्वांनी जल्लोष करून आपापल्या जातभाईंची तोंडे व अंगे घासून भेट घेतली.

जंगलातल्या यजमानांनी मग पाहुण्यांना एका आडवाटेने नेत झाडांनी वर्तुळाकार केलेल्या एका खाद्य-कुरणात नेले. तिथे असलेल्या गवत, रानफळे अशा पदार्थांवर सर्व जण ताव मारण्यास सज्ज झाले. पण सोबतच्या माणसाचे काय? त्याला हत्तीने विचारले असता घोंगडीबाहेर हात काढून त्याने त्याची खाऊची पिशवी दाखवली आणि दुसऱ्या हाताने 'तुम्ही तुमचे खा' म्हणून खूण केली. तेव्हा त्याच्या हातात बारीक काहीतरी चमकल्यासारखे दिसले.

पोटपूजा आटोपल्यावर सर्व विसावले. मग खलबतं, गप्पा सुरू झाल्या. मुखिया जंगली हत्ती म्हणाला, "आता आम्ही सर्व आहोत. धीरानं घ्या. माणसापुढं झुकायचं नाही आता."

एक बंदी काळा घोडा म्हणाला, "नुसते लगाम टाकले बघा त्यांनी. हमाल करून टाकलं आम्हांला."

"आम्ही हमाल, यांची दे धमाल.." पांढरा घोडा म्हणाला.

"आता इथं जंगलात तुम्ही सुरक्षित आहात," जंगली उंटाने धीर दिला.

"अरे पण माणसानंच हे जंगल अभयारण्य केलंय म्हणून तर तुम्ही सुरक्षित आहात ना?" घोंगडीवाला म्हणाला, तेव्हा सर्व त्याच्याकडे रागाने पाहू लागले.

यावर तो म्हणाला, "माणसाचं चुकत असेल; पण त्याचं जे चांगलं ते चांगलंच म्हणायला हवं की नको? आता दुसरं असं पाहा, की प्राण्यांना तर या खेळातून माणसानं केव्हाच सुट्टी दिलीय. त्यांची इंग्रजी नावं पाहा ना, कुठायत त्यात प्राणी, सांगा पाहू?"

"वा रे व्वा! काय म्हणतोय बघा गडी.." मुख्य घोडा म्हणाला, "तर मग माझं पटावरचं रूप खऱ्याखुऱ्या घोड्याचं का ठेवलंय? बोल आता.. उंट-हत्तींना फक्त माणसाच्या रूपाचा मुलामा दिलाय. त्यांची बिचाऱ्यांची काळीजं प्राण्यांचीच आहेत.."

रानातला एक उंट बोलू लागला, "पटावराच्या उंटाचा एक सोयरा मागं भेटला होता. हा उंट कुठल्याशा ऑलिम्पिकमधून परतला होता. त्याचे अनुभव हा सोयरा सांगत होता, की बुद्धिबळाच्या ऑलिम्पिक होतात म्हणे आणि तिथं आपणाला फार मागणी असते म्हणे! हजारोंनी तरबेज खेळाडू येतात तिथं. म्हणून आपली हजारोंच्या संख्येनं मागणी असते. तिथं शेकडोंनी मोठ्या पागा, शाळा बनवल्या जातात. त्यात म्हणे आपली बडदास्त ठेवली जाते; काही कमी नसतं. आपणांस माणसाळवलं जातं. म्हणजे आपण काही दंगल करू नये. खरं काय हे?"

"असेल एखादवेळ अनुभव त्याचा. पण चक्क थाप असण्याची शक्यताही आहे. एवढी प्राणिदया कुठली रे माणसाला बाप्पा!" मुख्य घोडा उद्‌गारला, "पण मोठमोठे बुद्धिबळपटू काय चमत्कार खेळतात सांगू..! काय त्यांच्या चाली.. काय डोकं.. कधी वाटतं, या बुद्धीच्या सुखात कायमच राहावं.."

सर्व जण एकदम चकित होऊन पाहू लागले, तर जंगली हत्ती सोंड उंचावून रागात गर्जून म्हणाला, "मग काय परत जायचं म्हणताय?"

त्यावर मुख्य घोडा सावरून घेत म्हणाला, "तसं नाही हो. एक आपलं बोललो झालं. त्रासासोबत चवीला थोडा विनोद हो. पण आपण परत जात नाहीय बरं.. आणि त्रास काय कमी आहे तिथं?"

जंगली मुखिया हत्ती म्हणाला, "विनोदाची ही वेळ नाही. आता आपण लागलीच आत जंगलात अति सुरक्षित जागी वाटचाल सुरू करू या."

वाटचाल संपेपर्यंत दिवस चांगला उजाडला होता.

"आतापर्यंत यांना आपलं बंड कळून आलं असेल. शोधाशोध सुरू झाली असेल. बातमी सर्वदूर पसरली असेल. नाराजी तर सर्वत्र होती. आता जगभर आपले जातभाई बंड करत आपापल्या जंगल निवासात परततील," मुख्य घोडा म्हणाला.

"पण बंड यशस्वी होण्यासाठी आज डावाच्या वेळेपर्यंत म्हणजे पाच वाजेपर्यंत आपण सावध वाट पाहू. सामना होत नाही म्हटल्यावर यांचे डोळे पक्के उघडतील! मग पटावरून आम्हांला कायमचं रिटायर करा म्हणावं!" पटावरचा एक काळा हत्ती उद्गारला.

...पण सामन्याचा सलामीचा डाव सुरू होण्यास सात-एक तास उरले असतानाच प्राण्यांच्या या गुप्त जागेसमोर अचानक पोलिसांची मोठीच्या मोठी फौज हजर झाली. सामना अधिकारी बोलणी करण्यास पुढे झाले. यात गंमतगुपित असे होते, की तो बुटका घोंगडीवाला वाटसरू हा, तसा कुणी नव्हताच मुळी! ते होते पटावरील एक प्यादे. त्याला यांच्या कुजबुजीची रात्रीच कुणकुण लागली होती. तेही मग वेश पालटून गुपचूप निघाले आणि मग वाटेत अचानक भेटण्याचा बहाणा करून यांच्यात सामील झाले. त्याच्याकडे होता हॉलमध्ये पूर्वीच कोणाचा राहून गेलेला मोबाईल. कोणी त्याची शोधाशोधच केली नव्हती आणि पटावरच्या चालींनी हुशार बनलेल्या या प्याद्याने मोबाईलच्या चालीही शिकून घेतल्या होत्या. याने केले काय, तर या गुप्त ठिकाणाचे हल्लीच्या भाषेत लोकेशन-बिकेशन की काय असते ना, ते धाडून दिले पोलिसांना.

बोलणी सुरू झाली. अधिकारी बाबापुता करू लागले. म्हणाले, "तुमचं जे काय म्हणणं असेल, ते मानतो. पण एकदा सामना पुरा होऊ द्यात. नाही तर आमची लाज जाईल हो त्यात. चला परत. आता वेळ नका दवडू."

प्राण्यांशी गंभीर चर्चा करून मग मुख्य घोडा बोलू लागला, "आम्ही तुम्हांला अडचणीत नाही टाकणार. आम्ही आताच नाही; नेहमीच पटावरचं कर्तव्य बजावत राहू. पण आमची काही मागणी आहे. स्पर्धा नसतात तेव्हा सुट्टी देऊन आम्हांला जंगलात विहरण्याचा हक्क मिळावा. उंट आणि हत्ती यांना पटावर घोड्यांप्रमाणे त्यांचे त्यांचे चेहरे मिळावेत. आणि मला म्हणजे पटावरच्या घोड्यांना अडीच घराच्या चालीऐवजी वजिराप्रमाणे सरळ आणि तिरकी अशी सामर्थ्याची चाल बहाल करावी. वजिरास घोड्याची अडीच घराची चाल द्यावी. बोला, देणार का हे सर्व?"

अधिकाऱ्यांना निदान आता तरी या मागण्या मान्य कराव्या लागल्या. बुद्धिबळाच्या जगज्जेतेपद सामन्याची सुरुवात झाली खरी; पण वजीर आणि घोड्याच्या चालींच्या ऐन वेळेच्या अदलाबदलीची गोष्ट ही सातासमुद्रापार जगभर पसरलेल्या बुद्धिबळ खेळाच्या इतिहासातली अगदी अद्भुत क्रांतिकारी गोष्ट ठरून गेली होती.

**संपर्क : ९२२२४४५२६**

# आठवणीतल्या फुलपाखरा..



आठवणीतल्या  फुलपाखरा
थोडं माझ्याशी बोलशील का?
क्षणभर गप्पा मारताना
मैफिलीत आज हसशील का?

आठवणीतल्या फुलपाखरा
क्षितिजावरती येशील का?
मंत्रमुग्ध गीत गाताना
तुझ्यासोबत नेशील का?


आठवणीतल्या फुलपाखरा
मकरंद थोडा देशील का?
उंच भरारी मारताना
तुझ्यासोबत घेशील का?

आठवणीतल्या फुलपाखरा
पंखाआड दडवशील का?
लपंडाव बागेत खेळताना
तूच मला पाहशील का?

आठवणीतल्या फुलपाखरा
पंख रंगाचे देशील का?
गीत जीवनाचे गाताना
स्वर शब्दांचे देशील का?

दिलीप धायगुडे
**संपर्क : ७७३८०३९१९५**





श्रीकांत बोजेवार

उत्तरार्ध

# रामभरोसे 'अशुभ बोल्या'

रामभरोसेला खात्री पटली होती, आपल्या जिभेला काही तरी होतंय. त्यानं आपली जीभ चाचपली आणि स्वतःलाच विचारलं, आपल्या जिभेला हाड नाही, खरंच जिभेला हाड असतं का माणसाच्या? घरी गेल्यावर आरसा पाहण्याच्या कल्पनेनं त्याला आताच घाम फुटला होता. सतत काही तरी अशुभ बोलतो म्हणून लोक त्याला लोक आता रामभरोसे 'अशुभबोल्या' म्हणू लागले होते. पुढे काय झालं?

रामभरोसे लगबगीनं घरी निघाला, घरी पोहोचताच तो आरशापुढे उभा राहिला आणि जीभ बाहेर काढून पाहिली, तर ती संपूर्ण काळी-निळी झाली होती. खरंच जांभळं खाल्ल्यावर होते तशी ती दिसू लागली



# बेभरवशा रामभरोसे

होती. मात्र त्याच्या लक्षात आलं की ती आकारानंही थोडी वाढलेली आहे त्यामुळे तिला तोंडात ठेवणंही अवघड होऊ लागलं होतं. आपण आता लोकांच्या भानगडीत नाक खुपसणं बंद केलं, कानांवर पडलेल्या गोष्टींची खातरजमा न करताच त्या सांगणंही बंद केलं, मग तरीही ही नवी भानगड काय निर्माण झाली आता? त्याचा तोच विचार करू लागला तेव्हा त्याच्या लक्षात आलं की आपल्या मेंदूत काही तरी अजब रसायन आहे आणि ते आपल्याला स्वस्थ बसू देत नाही. सतत काहीतरी अशुभ विचार आपल्या मनात येतात आणि ते बोलून दाखवल्याशिवाय आपल्याला चैन पडत नाही. आता यावर एकच उपाय आहे, स्वतःला घरात कोंडून घ्यायचं. पण राजानं आपल्याकडे तंटे सोडवण्याची जबाबदारी दिलेली आहे, ती पार पाडली नाही तर राजाचे शिपाई धरून नेतील आपल्याला. शिवाय पोटापाण्याचा प्रश्न होताच. मग त्यानं ठरवलं की आपण नाकाच्या दिशेनं सरळ पाहत रस्त्यानं जायचं, इकडे तिकडे पहायचंच नाही. म्हणजे आपल्याला कोणी दिसणार नाही आणि मनात कोणते विचारही येणार नाहीत.

चुन्यात पडून भाजलेल्या बत्ताशानं, 'राम्याच्या जिभंला हाडच न्हाय' असं म्हटल्याचं त्याच्या कानावर आलं होतं, काळी-निळी पडलेली जीभ बाहेर काढून त्यानं ती बोटांनी चाचपून पाहिली आणि स्वतःशीच पुटपुटला, 'खरंच आपल्या जिभेला हाड नाही, म्हणून तर ती सैल सुटत नसेल ना?' जीभ कशीबशी तोंडात कोंबत किंचित बोबड्या सुरात रामभरोसे आईला म्हणाला, 'आई गं, तुझी जीभ दाखव जरा, तिला हाड आहे का ते पहायचं आहे मला.' रामभरोसेची आई करवादून म्हणाली, 'आरं, कोणाच्याच जिभेला हाड नसतं राम्या, 'जिभेला हाड नाही' ही मराठी भाषेतली म्हण आहे. तुला कशी कळत नाही एवढी साधी गोष्ट?'

दुसऱ्या दिवशी सकाळी राम्या ठरवल्याप्रमाणं नाकासमोर बघत पाराकडे निघाला. रस्त्यात केशा दिसेल, पण त्याच्याकडे पहायचं नाही असं त्यानं मनातल्या मनात स्वतःलाच चार वेळा सागितलं. मात्र कडुनिंबाचं मोठं झाड जवळ दिसू लागलं तसा राम्याला केशाकडे पाहण्याचा मोह होऊ लागला. काल त्याचं धोतर पेटलं होतं, त्याला जास्त भाजलं तर नाही ना, याची चौकशी केली पाहिजे, असं त्याला वाटू लागलं. सरळ दिशेनं पाहत असलेली त्याची मान आपोआपच वळली. केशाच्या समोर खुर्चीवर त्याचं गिऱ्हाईक बसलेलं होतं आणि केशा त्याची मान एका हातानं वर करून त्याची दाढी करत होता. राम्या आपल्याकडे पाहतो आहे याची कल्पना येताच केशानं दाढी करणं थांबवलं आणि जोरात ओरडला, 'अजाबात तोंड उघडू नकोस तुझं.' रामभरोसे म्हणाला, 'केशा अरे मी तुझी चौकशी करणार होतो फक्त.' केशा आवाज वाढवून म्हणाला, 'चौकशी नको आन् नस्त्या चौकशाबी नको, जा तू आपला पारावर गुमानं.' रामभरोसं अपमानित चेहऱ्यानं पुढे निघाला. आता तर अजिबात बघायचंच नाही रस्त्यानं कुणाकडे, असा निग्रह त्यानं मनात केला.

पाखराबाई किराणा दुकानातून तेल, मीठ, तांदूळ घेऊन बाहेर पडली ती थेट राम्याच्या समोरच आली. तिला पाहताच राम्या ठरवलेलं सगळं काही विसरला



आणि तिला म्हणाला, ‘काल तुला पाहिलं तेव्हाच मला वाटलं होतं की तुझ्या मोळीतून निसटून लाकूड खाली पडेल आणि तसंच झालं. लाकूड खाली पडलं आणि कुंभाराचं कुत्रं मेलं बघ.’ हे ऐकल्यावर पाखराबाईचं डोकं सटकलं आणि ती म्हणाली, ‘मुडद्या, हे काल सांगायला काय तुझं तोंड शिवलं होतं कोणी? काल तोंड उघडलं असतं तर लाकूड पडलं नसतं, कुत्रं मेल नसतं आणि माझं आठ आण्याचं नुकसानही झालं नसतं. कसल्या कामाचा नाहीस तू.’ राम्याकडे रागानं पाहत पाखराबाई त्याला शिव्या घालत निघून गेली. रामभरोसेच्या मनातला गोंधळ आणखी वाढला. बोलावं तर नुकसान, न बोलावं तरी नुकसान. त्यात आपली जीभ मोठी होत आहे, काळी पडत आहे. आपण करावं तरी काय?

पारावर पोहोचवून लोकांचे तंटे सोडवू म्हणजे जरा विसर पडेल या गोष्टीचा, असा विचार करत गोंधळलेला रामभरोसे जलद गतीनं पाराकडं जाऊ लागला. मात्र चुन्यानं भाजलेल्या बत्ताशानं त्याची वाट अडवली आणि विचारलं, ‘काय रं राम्या, तुला माझं बरं बघवत न्हाय का?’ रामभरोसे गयावया करत त्याला म्हणाला, ‘अरे मी तर तुला सावध करत होतो.’ बत्ताशा म्हणाला, ‘न्हाय लेका, कसला सावध करत

हुतास? मी पडलो पाहिजे, असं तुला मनात वाटत असेल, म्हणूनच तू तसा बोललास आन् मी पडलो चुन्यात. बघ किती भाजलं.'

त्याला कसाबसा चुकवून रामभरोसे पारावर आला. तिथं पाच सात लोक तंटे घेऊन आलेलेच होते. त्यातला एक तंटा त्यानं ऐकला आणि त्यावर काही बोलणार तर त्याच्या लक्षात आलं की जिभेचा आकार आणखी वाढल्यानं त्याच्या तोंडून बोबडे बोल बाहेर पडत होते. शिवाय बोलण्यासाठी तोंड उघडलं की काळी-निळी पडलेली जीभ दिसत होते. लोक स्वतःचे तंटे विसरून राम्याच्या जिभेचीच चौकशी करू लागले. रामभरोसे खूप अस्वस्थ झाला. तंटे सोडवण्याचं काम गुंडाळून निघाला, मात्र घरी जाण्याचीही त्याला इच्छा होईना. आपलं शरीर आपल्याशी हा कसला खेळ खेळत आहे? कधी नाक मोठं होतं, कधी कानाच्या पाळ्या लोंबकळू लागतात. आता तर जिभेचा रंग काळा झाला आहे आणि तिची लांबीसुद्‌धा वाढत आहे. घाबरून तो स्वतःशीच बोलावं तसा मोठ्यानं म्हणाला, 'जीभ अशीच वाढत राहिली तर ती तोंडाबाहेर येईल आणि कुत्रा जसा जीभ बाहेर काढून लाळ गाळत राहतो तशी आपली गत होईल.' मात्र हे वाक्य तोंडातून निघता क्षणी त्याच्या अंगावर भीतीचा काटा उभा राहिला. आपले शब्द, आपल्या मनातली भीती खरी ठरते, मग ही भीतीही खरी ठरेल काय? या विचारानं तो हादरला आणि गावात जाण्याऐवजी विमनस्क होऊन जंगलाकडे गेला.

जंगलात एका तळ्याकाठी महादेवाचं मंदिर होतं, तिथं जाऊन तो डोळे मिटून बसला. संपूर्ण काळी पडलेली आपली जीभ बाहेर आली आहे आणि गावातली मूल आपल्याला घाबरून लांब पळत आहेत, असा दृश्य डोळ्यांपुढे आल्याने त्यानं घाबरून डोळे उघडले. तर समोर तळ्यात अंघोळ करत असलेला साधू त्याला दिसला. एक साप सळसळत साधूच्या दिशेनं येत होता. रामभरोसे घाबरून म्हणाला, 'अहो महाराज, बाहेर या साप आहे तळ्यात.'

साधू हसून म्हणाला, 'साप तळ्यात नाही, तुझ्या डोक्यात आहे.' रामभरोसेनं नीट पाहिलं तर तळ्यात साप कुठेच दिसत नव्हता. साधू तळ्याबाहेर आला आणि भगव्या कफणीनं अंग पुसत रामभरोसेकडे पाहू लागला. रामभरोसेनं हात जोडले आणि म्हणाला, 'महाराज मला वाचवा, माझ्या मनात अशा कल्पना येतात, मी त्या बोलून दाखवतो, त्या खऱ्या होतात आणि मग लोक मला शिव्या घालतात.'

साधू हसून म्हणाला, 'देवानं आपल्याला अवयव दिले आहेत आणि ते ताब्यात ठेवण्यासाठी मन दिलेलं आहे. काय पहावं, काय ऐकावं, काय बोलावं यावर आपला ताबा नसतो परंतु जे ऐकलं, पाहिलं त्याचं काय करावं हे मन ठरवतं, म्हणजे ताबा मनावर हवा. 'मन चिंती ते वैरी न चिंती' अशी म्हण आहे आपल्या मराठीत. याचा अर्थ असा की आपलं मन सतत धास्तावलेलं असतं, त्यात सतत अशुभ विचार येत असतात. मात्र ते बोलून दाखवायचे नसतात याचं भान आपल्याला हवं. तू जे बोलून दाखवलंस ते योगायोगानं खरं झालं, प्रत्येक वेळा तसं होईलच असं नव्हे. तेव्हा डोक्यातला साप ओठांवर आणायचा नसतो आणि खरोखरच साप दिसला तर मात्र गप्प रहायचं नसतं.' साधूचं बोलणं ऐकून रामभरोसेच्या मनात प्रकाश पडला, त्याला आणखी एक शहाणपण आलं. अचानक आपली जीभ पूर्ववत झाल्याचं त्याला जाणवलं, तो साधूच्या पाया पडला. साधू जंगलात निघून गेला. जंगलातून बाहेर पडण्याआधी रामभरोसनं तळ्याच्या पाण्यात वाकून पाहिलं आणि जीभ बाहेर काढली...तिचा रंगही पूर्ववत झाला होता. खुशीत शीळ वाजवत राम्या घराकडे निघाला.

**संपर्क :** ९८९२४१९२६७

सती भावे- हाल

# शिक्षा



**अनि उर्फ अनिरुध्द नावाचा एक खोडकर व उनाड मुलगा. त्याच्या खोड्यांना घरचे लोकही कंटाळून गेलेले असतात. पुढे त्याची रवानगी होते ती एका विचित्र 'अजबघरात'. तिथला निसर्ग, तिथली माणसे आणि तिथले जगणे अद्भूत असेच आहे. इथले ताओ आजोबा तर फारच भन्नाट आहेत. जीवनाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलवणारी 'अजबघर' ही नवी लेखमाला या अंकापासून सुरू करीत आहोत.**




हॅलो! मी या मॅड आणि विचित्र 'अजबघर' मध्ये का आलो त्याची स्टोरी आधी सांगतो. 'अजबघर' ही नेमकी काय गोष्ट आहे आणि ताओ आजोबा ही काय चीज आहे हे तुम्हांला हळूहळू कळेलच. मला तर कधीकधी ते एलिअन आहेत असापण संशय येतो अजून सुद्धा.

तर झालं असं...

'आपल्याला कुणी काही पण म्हटलेलं चालतं. फक्त शेंबड्या म्हटलेलं चालत नाही. त्या दिवशी माझा बर्थडे होता. वाढदिवस असला की काहीतरी राडा होतोच. वाढदिवस शाळेत असला की मजा असते. पण त्या दिवशी होता रविवार. बाबा मला बर्थडेला सायकल देतो म्हणाला होता. त्याने सायकल दिली पण इतकी बोरिंग सायकल दिली. काळी, उंच, गिअर नसलेली. मी तर हात पण नाय लावणार. पण मी बाबाला काही बोललो नाही. मी ती सायकल घेऊन सोमवारी सकाळी परत आलो.'

आई म्हणाली, "बाबाकडे काय काय झालं सांग." मी म्हटलं, "तू बाबालाच विचार." मी बॅग फेकली आणि दार धाडकन आपटलं. आई म्हणाली, "तू तुझ्या बापाच्याच वळणावर गेलायस." ती रडायला लागली. बाबा त्याच्या घरी रहायला गेल्यापासून आई सारखी रडते. मला बोअर होतं. आईने नंतर समजून काढली. पण मी घुश्श्यातच शाळेत गेलो.

वर्गात मी एन्ट्री मारली तर बोकड आरण्या ओरडला, "ए शेंबड्या, दोन वेगळ्या रंगाचे मोजे घालून आला का रे?" सगळे जण हसायला लागले. मग माझी सटकली. मी अरण्याला धू धू धुतला. मग गेंड्याने मला धू धू धुतला आणि वर्गाबाहेर काढलं.

शाळेत फोनची परमिशन नाहीये. मुलं बॅगमध्ये बंद करून ठेवतात आणि शाळा संपल्यावर बाहेर काढतात. मी वर्गाबाहेर जाताना हळूच फोन खिशात ठेवून गेलो. वर्गाबाहेरून मला आर्या दिसत होती. मी तिला मेसेज टाकला.

आर्याचा मोबाईल सायलेंटवर नव्हता. गेंड्याने तिला पकडलं. तिने माझं नाव सांगितलं. म्हणाली, "मी तिला मेसेज करून नेहमी त्रास देतो." आपला पुरता हार्ट ब्रेक झाला. गेंड्यानी प्रिन्सीपल सरांकडे नेलं. त्याने आई बाबाला शाळेत बोलावलं. आई बाबाचं खूप मोठं भांडण झालं. आजी आईला खूप बोलली. केवढा ड्रामा झाला.

आईची एक शाळेतली फ्रेंड आहे. रूचा मावशी. ती मनाची डॉक्टर आहे. आई मला तिच्याकडे घेऊन गेली. मला बाहेर टिव्ही लावून दिला. केक दिला आणि त्या दोघी आतल्या खोलीत जाऊन बोलत बसल्या. माझ्याविषयीच बोलत असणार. मी कसा अभ्यास करत नाही. कसा मुलांना मारतो. आई माझ्या चहाड्या सांगत असणार. मला फार म्हणजे फारच बोअर झालं. वाटलं, घरातून पळूनच जायला पाहिजे. बाबाला पण मी आवडत नाही. आईला पण आवडत नाही. बाबा मारतो. आई रडते. बास झालं यार. आता मी काही लहान नाहीये. दहा वर्षांचा झालोय. आता सहावीत जाईन.

स्कूटरवर आईच्या मागे बसून घरी पोहोचेपर्यंत मी हाच विचार करत होतो.




रूचा मावशीशी बोलून आई छान मूडमध्ये होती. तिने मला आवडतं तसं मॅगी केलं. "मनू तो टिव्ही बंद कर आणि माझं जरा ऐक रे". नऊ वेळा गोड आवाजात बोलून मी, ऐकलं नाही म्हटल्यावर आई जोरात ओरडली, "अनी इकडे ये." मी शेवटी टीव्ही बंद केला आणि खाली मान घालून आईसमोर जाऊन बसलो. आई एव्हाना पुन्हा रागावली होती. तिचा पट्टा सुरू झाला. "परीक्षा दहा दिवसांवर आहे पण तुझा काहीच अभ्यास नाहीये. तू होमवर्क पूर्ण करत नाहीस. तू मारामारी करतोस. तू माझ्याशी किंवा बाबांशी धड बोलत नाहीस. तू खोटं बोलतोस. तू एक मिनीट कुठे शांत बसत नाहीस. तुला बॅडमिंटनला घातलं, एका आठवड्यात सोडलंस. तबला आणला. एका महिन्यात फोडून ठेवलास. काल दिघेसर सांगत होते, तू यावर्षी नक्की नापास होणार. बाबा म्हणतोय तुला हॉस्टेलला पाठवूया." आई पुन्हा रडायला लागली. मलापण खूप रडायला आलं.

"मी नाही जाणार हॉस्टेलला." मी डोळे पुसत म्हणालो.

"मी त्याचसाठी रूचामावशीकडे गेले होते. रूचाचे वडील मोठे मानसशास्त्रज्ञ आहेत. म्हणजे मनाचे शास्त्रज्ञ. सुट्टीत दोन महिने त्यांच्याकडे जाऊन रहा मस्त. त्यांच्याकडे खूप गमती आहेत." आई माझे डोळे पुसत म्हणाली, "आपण दोघंच जायचंय? बाबापण येणारे?" मी विचारलं. "तू रूचामावशीबरोबर जायचं. फार गोड आहे रूचा मावशी. मी तिला, तिच्या आईबाबांना लहानपणापासून ओळखते. रूचामावशीचे आईबाबा आणि वसुधाआजी एकाच कॉलेजमध्ये होते. ते कुठे राहतात माहितीये? डेहराडून जवळच्या जंगलात." आई हसून म्हणाली. जंगलात जायचं या कल्पनेनी मला जरा मजा वाटली. पण मानसशास्त्रज्ञ आजोबांची भिती वाटत होती. मला उंदीर करून माझ्यावर प्रयोग करणार का काय ते? बापरे... असं काही असेल तर मी नक्कीच पळून जाईन. असं मी ठरवलं.

आई, बाबा दोघंही न भांडता मला विमानतळावर सोडायला आले. खूप मोठी सूचनांची यादी आणि खाण्याचे खूप पदार्थ घेऊन मी आई बाबांना टाटा केला. विमानात पहिल्यांदाच बसणार होतो. रूचामावशी खूप गप्पा मारत होती. आई आणि ती लहानपणी किती खोड्या करायच्या, शेजारच्या काकूंच्या झाडाच्या कैऱ्या चोरायच्या, कॉलेजात तास बुडवून सिनेमा बघायच्या अशा खूप गमती तिने सांगितल्या. पुण्याहून दिल्ली, दिल्लीहून डेहराडून. डेहराडून टॅक्सीने डोंगरातल्या वळणावळणाच्या रस्त्यांवरून एखाद्या जादूच्या जगात चालल्यासारखं वाटत होतं.

एकीकडे मी वाईट मुलगा आहे म्हणून मला शिक्षा म्हणून इथे पाठवलंय असं वाटत होतं आणि एकीकडे एखाद्या साहस कथेतल्या हिरोसारखं वाटत होतं.

टॅक्सी थांबली आणि खाली उतरलो. "चलो. आता इथून घरापर्यंत चालत जायचं." असं म्हणून आम्ही बॅगस् उचलल्या. समोर लाकडी फळीवर कोरलेली अक्षरे आणि बाण होता. "अजबघर"!

*तुमच्या डोळ्यांसमोर येणारं "अजबघर" कसं असेल? त्याचं चित्र काढून वर्णन लिहा.*
*तुम्हांला कुणी मानसशास्त्रज्ञ माहीत आहेत का? खालील व्हॉट्सअप नंबरवर तुमची उत्तरं पाठवा तसेच त्याबरोबर तुमचं नाव, शाळा आणि इयत्ता लिहायला विसरू नका.*

**संपर्क : ९८२२०३३०७५**

# मी एक दुर्ग बोलतोय

इतिहासाचा मी साक्षीदार
लढाया बघितल्या जोरदार
तेच आता सगळं सांगतोय
मी एक दुर्ग बोलतोय.

स्वातंत्र्यासाठी रक्त सांडले
लाखो लोक अहोरात्र झुंजले
वीरांच्या नावाने जयघोष होतोय
मी एक दुर्ग बोलतोय.

मातीची कैद रखडलेली
जीवांचे मोल देऊन सोडवली
शाहीर त्यांचा पोवाडा गातोय
मी एक दुर्ग बोलतोय.

मातीसाठी लढले मावळे बेभान
स्वराज्याची बांधली देखणी कमान
झेंडा अजूनही डौलात फडकतोय
मी एक दुर्ग बोलतोय.

कोसळलेला माझा कडा
बालेकिल्ला दिमाखात खडा
उरात ज्वलंत इतिहास राखतोय
मी एक दुर्ग बोलतोय.



**देविदास सौदागर**
संपर्क - ९१७५५४६५९३

शशिकांत काळे



# कालगणना

आपल्या सर्वांना इसवी सन (इ.स.) ही कालगणना माहीत आहे. आपल्या किशोर मासिकाच्या अंकावरही हीच वर्षे, महिने लिहिलेले असतात. ह्या कालगणने संबंधी थोडीशी माहिती करून घेऊया...

ह्या कालगणना पद्धतीला ग्रेगोरीयन कालगणना असेही म्हटले जाते. ही कालगणना बाबिलोनियन लोकांनी इ.स.पूर्व ९०० तरी सुरू केलेली होती. सुरुवातीला ह्या कालगणनेच्या वर्षात मार्च ते डिसेंबर एवढेच फक्त १० महिने होते. म्हणजे मार्च हा वर्षाचा पहिला महिना होता आणि डिसेंबर हा शेवटचा म्हणजे १० वा महिना होता. ह्या महिन्यांची काही नावे भारतीय संख्यांकाशी मिळती जुळती होती. उदा. ६ वा महिना ऑगस्ट (षष्ठ), ७ वा महिना सप्टेंबर (सप्तम), ८ वा महिना ऑक्टोबर (अष्टम), ९ वा महिना नोव्हेंबर हा (नवम) आणि सर्वात शेवटचा दहावा महिना (दशम). एवढेच नव्हे तर रोमन पद्धती नुसार १० वा अंक ह्या X ह्या

चिन्हाद्वारे दाखवला जातो. त्यामुळे त्या महिन्याला Xmas म्हणजे दशमास असे संबोधले जात होते. हे दहा महिन्यांचे वर्ष फक्त ३०० दिवसांचे होते. त्यामुळे त्याचा मेळ सूर्यभ्रमणाच्या ३६५ दिवसांबरोबर जमत नव्हता. त्यामुळे इ.स.पूर्व ६९३ मध्ये न्युपा नावाच्या राजाने त्यामध्ये जानेवारी आणि फेब्रुवारी ह्या दोन महिन्यांची भर घालून ते वर्ष ३६५ दिवसांचे केले. त्याच बरोबर काही महिने ३० तर काही ३१ दिवसांचे केले. हे लक्षात ठेवायची सोपी पद्धत म्हणजे मूठ मिटून उलटी धरा. त्यानंतर बोटाच्या तळाशी उंचवटे दिसतील. त्या उंचवट्यांवर व खळग्यांवर महिने मोजा; जे महिने उंचवट्यावर आहेत. त्या महिन्यांत ३१ दिवस असतात तर खळग्यांमधील महिन्यांचे फक्त ३० दिवस असतात. एवढे करूनही ते दिवस ३६५ पेक्षा जास्त भरतात. त्यावर उपाय म्हणून फेब्रुवारी महिन्यात फक्त २८ दिवसच असतात. तरी सूक्ष्म फरक राहतो. त्यासाठी ज्या वर्षाला ४ ने भाग जातो. त्या वर्षात फेब्रुवारी महिन्याचे २९ दिवस धरले जातात. अशा वर्षाला 'लीप इयर' असे म्हणतात. त्याच्याही पुढे दर शंभरावे वर्ष जरी लीप इयर असले तरीही त्या वर्षात फेब्रुवारी महिना फक्त २८ दिवसांचाच धरला जातो. तरीही जो थोडासा सूक्ष्म फरक राहतो. त्याची काळजी घेण्यासाठी ४०० ह्या संख्येने भाग जाणारे वर्ष लीप इयर समजले जाते.

स.न.१७५२ साली आणखी एक मजेशीर प्रकार घडला. तो म्हणजे सप्टेंबर १७५२ महिन्यातील ३ ते १३ हे अकरा दिवस गाळण्यात आले. म्हणजे सप्टेंबर महिन्यात २ तारखेनंतर एकदम १४ तारीख समजली गेली.

कोणत्याही बदलाला सर्वसाधारण विरोध होतच असतो. सन १७५२ पर्यंत जुने लोक १ एप्रिल हाच वर्षारंभाचा दिवस म्हणून साजरा करीत असत. पण त्या वेळच्या राजाच्या राजाने हुकूम काढून सर्व जनतेने १ जानेवारी हीच नवीन सुरुवात मानावी असे जाहीर केले. एवढेच नव्हे तर जे लोक १ एप्रिल हाच नवीन वर्षाचा आरंभ साजरा करतील त्यांना APRILS FULL असे समजावे असाही हुकूम काढला. एप्रिल फुलची जन्म कथा ही अशी आहे.

आपल्या देशात दिवाळी, दसरा, होळी ह्या सारखे सण आणि उत्सव साजरे करतो ते मात्र भारतीय कालगणने प्रमाणेच करतो. तुम्ही कोणतेही पंचांग घेतले तरी त्याच्या मुखपृष्ठावर शालिवाहन शक आणि विक्रमसंवत अशा दोन भारतीय कालगणनांचे उल्लेख आठवतील. शालिवाहन शक हा मुख्यत्वेकरून महाराष्ट्रात अनुसरला जातो तर विक्रमसंवत इतरत्र पाळला जातो.

दोनही कालगणनेमध्ये वर्षाचे महिने १२च आहेत. त्यांची नावे ही चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, अश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन अशी आहेत आणि ते महिनेही त्याच क्रमाने येतात. दिवसाचे एकक तिथी आणि वार आहेत. रविवार ते शनिवार हे सात वार संपूर्ण वर्षभर एकाच क्रमाने येतात. संपूर्ण महिना तिथीनुसार दोन गटांत विभागलेला असतो. प्रत्येक पंधरवड्यात १५ तिथी असतात. पहिल्या पंधरवड्याला शुद्ध पक्ष किंवा शुक्ल पक्ष म्हणतात. त्या पंधरवड्यामध्ये चंद्राच्या कला रोज वाढत जातात. ज्या रात्री पूर्ण चंद्र दिसतो. त्या तिथीला पौर्णिमा असे म्हणतात. त्यानंतर चंद्र लहान लहान होत जातो. त्याच बरोबर तो सूर्याच्याजवळही जात असतो. त्यामुळे चंद्र सूर्य एकत्र आले की त्या काळोख्या रात्रीला अमावस्या म्हणतात. त्यावेळी चंद्र-सूर्यामधील कोनीय अंतर ० अंश असते तर पौर्णिमेला ते १८० अंश असते. सर्वसाधारणपणे सूर्य एका दिवसात १ अंश पुढे जातो. तर चंद्र १२ अंश पुढे जातो. अमावस्येनंतर प्रतिपदा ह्या तिथीला सुरुवात होते आणि हे अंतर जेव्हा १२ अंश होते त्या वेळी प्रतिपदा तिथी संपली असे म्हणतात. त्यामुळे प्रत्यक्षात वार आणि तिथी यांचा मेळ आधीच बसत नाही.

भारतीय कालगणना चंद्रभ्रमणाशी निगडीत




असल्याने महिन्यांची नावेसुद्‌धा चंद्राच्या स्थानाबरोबरच जोडलेली आहेत. पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्राजवळ असतो. त्या महिन्याला त्या नक्षत्राचे नाव दिले जाते म्हणजे ज्या पौर्णिमेला चंद्र चित्रा नक्षत्राजवळ असतो तो चैत्र मास, विशाखा नक्षत्राजवळ असतो तो वैशाख मास इ. शालिवाहन शक असो वा विक्रमसंवत तिथी आणि त्यानुसार महिन्यांची नावे ह्याच तत्वावर आधारित आहेत. त्यामुळे सर्व सण, उत्सव, धार्मिक विधी हे एकाच दिवशी येतात.

दोन्ही कालगणनांमध्ये मुख्य फरक वर्षारंभाचा आहे. शालिवाहन शकाचे नवीन वर्ष चैत्र शुद्‌ध प्रतिपदा ह्या दिवशी सुरू होते. ह्या वर्षी हा दिवस इ.स. कालगणनेनुसार २ एप्रिल दिवशी आहे. तो दिवस आपण गुढीपाडवा म्हणून साजरा करतो.

विक्रमसंवतचा वर्षारंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदा असतो. हा दिवस दिवाळी पाडवा म्हणून (बलिप्रतिपदा) दिवाळीच्या दिवसांतच अंतर्भूत असतो. आता आपण भारत शासनाने सुरू केलेल्या भारतीय सौर वर्षाचा परिचय करून घेऊया.

भारत शासनाने एक समिती नेमून अभ्यासाअंती ही कालगणना तयार केली आहे. ही कालगणना २२ मार्च १९५७ ह्या दिवसांपासून अधिकृतरित्या सुरू केली गेली.

ह्या कालगणनेमध्येही सबंध वर्षात १२ महिने येतात. त्यांची नावेही चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, अश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन अशीच आहेत. (पण त्यांचा चंद्राशी संबंध नाही). फक्त मार्गशीर्ष ह्या महिन्याला मात्र 'अग्रहायण' असे नाव दिलेले आहे. ह्या सौर वर्षातील दिवसांची संख्या ३० किंवा ३१ आहे. म्हणजे चैत्र ते अग्रहायण हे महिने ३० दिवसांचे असतात. तर अश्विन ते फाल्गुन हे महिने ३१ दिवसांचे असतात. इंग्रजी कालगणनेप्रमाणे भारतीय सौर वर्षामध्ये ४ ने भाग जाणारे वर्ष लीप इयर समजले जाते. त्यामुळे इतर सर्व वर्षांचे नवीन वर्ष २२ मार्च रोजी सुरू होते. पण लीप इयरमध्ये मात्र ते एक दिवस अगोदर म्हणजे २१ मार्च रोजी सुरू होते.

भारतीय सौर कालगणना जशी १९५७ या वर्षी सुरू झाली. तरी भारतीयकरण करण्याच्या उद्‌देशाने ते पहिले वर्ष १ असे न धरता ते वर्ष १८७० असे धरले जाते. त्यामुळे ही कालगणना जरी फक्त ६६ वर्ष इतकीच जुनी असली तरी त्या कालगणनेचे सध्या सुरू असलेले वर्ष मात्र १९४४-४५.

दुसरी गोष्ट म्हणजे वाराची व्याप्ती भारतीय कालगणनेनुसार आजच्या सूर्योदयापासून उद्याच्या सूर्योदयापर्यंत असते. पण इंग्रजी कालगणनेनुसार वार मध्यरात्री म्हणजे रात्री १२ वाजता बदलतो.

**संपर्क ९९७५२४४४६७**

# झाडं लावणारी मुलं

एक दोन बिया मातीत पुरतात
छोटी छोटी मुलं झाडं लावतात

थेंब पडता
माती पिकते
हिरवी सृष्टी
शेत डोलते
झाडे मातीतून उगवून येतात,
मुलं हिरवी हिरवी गाणी गातात...

मिळूनी सारे
पक्षी पळती
खळाळ नद्या
दूर वाहती
पाऊसपाण्यात झाडं उंच वाढतात,
तापत्या उन्हात मुलं पाणी घालतात...

नवी पालवी
गर्द फुटते
ऊन सावली
खेळ खेळते
झाडांना रोज बिलगतात लेकरं
फांद्यांवर येतात रंगीत पाखरं ...

मुलं गुणाची
सांगा कुणाची
मुलं झाडांची
फुलं कळ्यांची?
मुलं झाडांसोबत करतात दोस्ती
नाचतात, गातात मुलं करतात मस्ती...



गणेश आघाव
संपर्क - ८०८०१९५३४४



# पिवळा पतंग

**कल्पना दुधाळ**

सावू आणि देवू दोघं पतंग विकत घ्यायला दुकानात गेले होते. रंगीबेरंगी पतंगांमध्ये पिवळा पतंग सुंदर तजेलदार रंगाचा होता. सावू म्हणाली, “मला हा आवडलाय. किती छानैना.”

“हो, मलापण तोच आवडलाय” देवू म्हणाला.

“मग हाच घेऊया” दोघांनी ठरवलं.

पतंग, मांजा घेऊन ते टेकडीवर आले. पावसामुळे सगळीकडं लुसलुशीत गवत उगवलं होतं. पिवळी, गुलाबी, निळसर रानफुलं फुलली होती. फुलपाखरं भिरभिरत होती. इतर काही मुलंही पतंग उडवायला आलेली होती.

देवू म्हणाला, “आमचा गावाकडचा दादा ना घरी पतंग बनवतो. खूप मोठ्ठा. त्याला



पतंग नाही वावडी म्हणतात. बांबूच्या पातळ कामट्या, रंगीत कागदाचे पातळ ताव, डिंक, दोरा असं सगळं सामान असतं त्याच्याकडे."

सावूला प्रश्न पडला "कामट्या म्हणजे काय आणि कशासाठी ?"

"म्हणजे बघ हा जो पतंगाचा सांगाडा बनवलाय ना ह्या बांबूच्या कामट्या. त्या तासून पातळ पट्ट्या बनवाव्या लागतात. त्या चिवट असतात. वळतातदेखील हव्या तशा. शिवाय हलक्या असतात. ही मध्ये अशी धनुष्यबाणासारखी वाकवलेली कामटी बघितली ना" देवूने सांगत होता.

"ताव ताणून घेऊन त्याचे काठ दुमडून कामठ्यांना चिकटवायचे. खालच्या बाजूला रंगीत कागदाच्या झुरमुळ्या लावलेली वावडी भारी दिसते. उडवून झाल्यावर दादा ती वावडी घराच्या छताला लटकवून ठेवतो. पुढच्या वर्षी काढून जरा डागडुजी करून उडवायला नेतो. भली मोठी असते ती" देवू वर्णन करत होता.

"यापेक्षा मोठी ?"

"हा पतंग काहीच नाही. ती वावडी बांगबांगबांग करत आभाळात गेली ना तिचंच आभाळ." देवू हातवारे करून सांगत होता.

"मी पण जाईन बांगबांगबांग करत."

"हे कोण बोललं ?" सावू आणि देवू दचकून म्हणाले. ते इकडेतिकडे बघू लागले.

"अरे मीच बोलतोय, पतंग."

"प... प... पिवळा पतंग ?" सावू कसंबसं बोलली.

"हो. तुम्ही मला पिवळा पतंग ही म्हणू शकता." देवूच्या हातातला पिवळा पतंग चक्क बोलत होता. दोघं आश्चर्याने बघत होते. ते घाबरले होते.

"घाबरू नका. तुम्ही हातात घेतले तेव्हाच मला खूप आनंद झाला. तुम्ही गुणी मुलं आहात." पिवळा पतंग म्हणाला.

"तुला कसं माहीत आम्ही गुणी आहोत ते ?" सावू विचारले.

"तसं म्हणावं लागतं" पतंग म्हणाला.

"म्हणजे ?"

"म्हणजे बघा. मी जर तुम्हांला वेगळंच काही बोललो तर तुम्ही घाबरून मला इथं टाकून गडबडून, ओरडत पळत सुटाल. मग मला आभाळात कोण उडवेल. माझा मी नाही ना उडू शकत. तुम्ही मला उडवलं तर मी खुशीत गिरक्या घेईन."

सावू म्हणाली "देवू, असा बोलका पतंग मी कधीच बघितला नव्हता."

"मी पण नव्हता. हा काही करणार नाही ना आपल्याला ?" देवू म्हणाला.

"छे छे, मी तुम्हांला काहीही करणार नाही. तुम्ही मला आभाळात उडायला मदत करा. माझा रंग किती सुंदर आहे बघा."

"हो मी बघितल्या बघितल्या लगेच उचललं ना तुला." सावू म्हणाली.

"निळ्या आभाळात उडणारा पिवळा पतंग किती छान दिसेल. निळ्या आभाळात निळा पतंग कसा दिसेल ना, किंवा दिसणार नाही." पतंग बोलत होता.

"मी खाली आल्यावर वरून काय काय दिसलं ते तुम्हांला सांगेन. आपण खूप गप्पा मारू. उद्यापण इथं येऊ. मला ना आभाळात

गिरकणं आणि जमिनीशी धाग्यानं बांधून असणं, फार आवडेल."

सावू आणि देवूला आनंद झाला. मग ते टेकडीच्या आणखी वर आले. छान वारं होतं. त्यांनी पतंगाला मांजा, शेपूट बांधलं.

पतंग फार उल्हासित झाला होता. म्हणाला, "सावू, देवू... तुमच्यामुळे आज माझं स्वप्न साकार होणार"

"आमचंपण."

सावूने चक्री धरली. देवू ढील देत देत पुढे जात होता. दोनतीन वेळा खाली पडल्यावर हेऽ हेऽ हुर्रे करत पतंग गिरक्या घेत वर जाऊ लागला. देवू, सावू पण हेऽ हेऽ हुर्रे करू लागली. मांजा ताणला जाऊ लागला. पतंगाखालची हवा त्याला ढकलत ढकलत वरवर नेऊ लागली.

पतंग ओरडला, "फार फार छान आहे आभाळ. टेकडीवर उभे असलेले तुम्ही दिसत आहात मला. अजून मांजा सोडा अजून. ते पहा दुसरेही पतंग आहेत वर. लाल, नारंगी, गुलाबी, हिरवे. आता मजा. मला सगळ्यात वर जायचंय."

पतंग वरवर चालला होता. शेपटीचा गोंडा वाऱ्यावर मस्त हेलकावत होता.

सगळा मांजा संपला. सावू देवूला म्हणाली "आता तू धर. माझे हात दुखून आले."

मग देवूने धरला. तो उंच खडकावर उभा राहिला. मग पतंग अजून वर गेला. देवू अजून उंच खडकावर गेला. वारा जोरावला होता. पतंग गिरक्या घेत होता. मान दुखेपर्यंत सावू आणि देवू पतंग बघत होते.

देवू सांगत होता "तुला माहितीये का सावू, पतंगाच्या मांजामध्ये अडकून बिचारे पक्षी मरतात. काही ठिकाणी तर माणसांचे देखील जीव जातात. आपला खेळ होतो आणि त्यांचा जीव जातो."

ते ऐकून सावूला वाईट वाटलं. ती म्हणाली " का रे दावू, पतंग फक्त आनंद मिळवण्यासाठी उडवतात की अजून कशासाठी? माणसाने पतंगाचा शोध लावला खरा पण त्याने पतंगाचे अनेक उपयोग करून घेतले असणार. हो ना ? आपण मोठ्या माणसांना, शिक्षकांना विचारू का?"

"हो विचारू खरंच आपल्याला माहिती पाहिजे ना ते. आपल्याकडे मकरसंक्रांतीला लोक पतंग उडवतात. काही ठिकाणी पतंग महोत्सव भरवतात. पतंगबाजीच्या स्पर्धा ठेवतात. वेगवेगळ्या देशांत देखील पतंग उडवतात." देवू म्हणाला.

इतक्यात देवूच्या हातातून चक्री निसटली आणि आभाळातला पिवळा पतंग सैरभैर झाला. कोलमडत अडखळत गटांगळ्या खात खाली येता येता मोठ्या बाभळीच्या झाडावर अडकला. सावू आणि देवू हिरमुसले. पतंगाकडे बघत राहिले. पतंग अशा शेंड्यावर अडकला होता की, तिथं कुणाला जाता येणार नव्हतं. शिवाय ते बाभळीचं झाड.


सावू म्हणाली "बिचारा पिवळा पतंग. बोलका पतंग. वरून काय काय दिसलं ते तो कसं सांगणार आपल्याला?"

काय काय दिसलं असेल त्या पतंगाला वरून ?

**संपर्क : ९९२३६२७२१८**

# गणिताचा गमतीदार मॉर्निंग वॉक

पिंटूच्या आजोबांनी
जॉगर्स पार्कमध्ये
पिंटू बरोबर
मॉर्निंग वॉक घेताना
गणिताचा मार्ग पण
पिंटूला सोडवायचाय ...
तुम्ही पण मदत करा ना !
बघा जमतंय का!




श्रीनिवास प्रभुदेसाई

नंदकिशोर शुक्ल

# वाफेच्या शक्तीचा शोध

फार पूर्वीपासून चाकावरून वस्तू वाहून नेणे माणसाला अवगत होते. गाड्या, मानगाड्या आणि प्रवासी वाहतुकीच्या गाड्या माणूस चालवायचा ते चाकांवरूनच. नंतर तो विणण्याचे काम स्पिनिंग चाके वापरून करू लागला. मडके आणि भांड्यांसाठी कुंभाराचे चाक त्याने तयार केले. घड्याळाच्या आत पाहिले तर परस्परांत गुंतलेली असंख्य चक्रे आपणास दिसतात. पवनऊर्जा आणि वीजनिर्मितीही चाकांच्या साहाय्यानेच होते. पण वारा कायम वाहत नाही, आणि पाण्याचे प्रवाह उन्हाळ्यात आटतात. मग चाके फिरवण्यासाठी शाश्वत स्रोत कोणता? तर तो आहे पाण्याची वाफ. जेम्स वॅटने अठराव्या शतकात हा स्रोत शोधून काढला.



वाफेच्या शक्तीचा शोध जेम्स वॅटला कसा लागला? तर त्याची एक कहाणी आहे. जेम्स वॅट स्कॉटलंडमध्ये राहत होता. जेम्स वॅट लहान असताना तो जाळावर ठेवलेली किटली पाहत असे. किटलीचे झाकण उडताना तो पाही. एकदा त्याला किटलीकडे बघत बसलेला पाहून त्याची काकू त्याच्यावर ओरडली. ती म्हणाली, "तू आपला वेळ फुकट घालवतो आहेस. तू अतिशय आळशी मुलगा आहेस. तुझ्याकडून जगाचे काही भले होणार नाही." पण तिने वॅटमधला संशोधक ओळखला नाही. वयाच्या पस्तिसाव्या वर्षी वॅटने पूर्वीची बोजड वाफेची इंजिने बदलून टाकली आणि तेथे उपयुक्त हलके इंजिन बनवले. वॅटच्या पूर्वी हिरो नावाच्या माणसाने, जो दुसऱ्या शतकात अलेक्झांड्रियात राहत होता, एक खेळण्यातले वाफेचे इंजिन बनवले होते. ते इंजिन एक छोटा चेंडू उडवायचे. पण हिरोचे इंजिन हे केवळ एक खेळणे होते. वाफेचा खरा उपयोग अठराव्या शतकातच झाला. कापड उद्योगात कामाचा वेग वाढवण्यासाठी वाफेच्या इंजिनाचा उपयोग होऊ लागला. त्यामुळे कापड विणण्याचा वेग वाढला. ही कापड विणण्याची यंत्रे मोठी असल्याने त्यांना अधिक शक्तीची गरज होती.

कोळशाच्या खाणीतून कोळसा काढण्यासाठी खाणीतील पाणी उपसावे लागे. त्यासाठी ही वाफेची इंजिने वापरली जायची. वातावरणातील हवेच्या दाबामुळे ही इंजिने चालत. उकळत्या पाण्यामुळे एक पोकळी निर्माण केली जाई आणि नंतर ती गोठवली जाई. कमी पाण्यातून प्रचंड वाफ निर्माण होई. वॅटपूर्वी न्युकोमेन नावाच्या ब्रिटीश इंजिनिअरने हे यंत्र निर्माण केले होते. त्यासाठी या यंत्रात एका पिस्टनचा आणि सिलेंडरचा उपयोग त्याने केला होता. सिलेंडरच्या आत वाफ साठवली जाई आणि बाहेरील हवा पिस्टनला गती देई. पिस्टनमुळे मोठमोठ्या रॉड्सना गती मिळे आणि पाणी बाहेर फेकले जाई. न्युकोसेन आणि इतर लोक या इंजिनला आगीचे इंजिन असे म्हणत. हे इंजिन हातपंपापेक्षा चांगले होते, पण ते प्रचंड कोळसा खात असे.

जेम्स वॅट मोठा झाल्यावर इंजिने बनवू आणि दुरुस्त करू लागला. एकदा त्याच्याकडे हे न्युकोमेनचे यंत्र दुरुस्तीसाठी आले. या यंत्रात कोळशाचा किती अपव्यय होतो हे वॅटच्या तेव्हाच लक्षात आले. प्रथम वाफेच्या साहाय्याने सिलेंडर गरम केले जात असे, नंतर ते थंड केले जाई. या प्रक्रियेत प्रचंड वाफ वाया जाई. जर सिलेंडर कायम गरम ठेवले तर वाफ वाचेल. खूप विचारांती वॅटने या समस्येवर उत्तर शोधले. यंत्रात बरेच बदल करून वॅटने उच्च दाबाच्या साहाय्याने पिस्टन चालवायची व्यवस्था केली. बॉयलर अधिक मजबूत केला. जेणेकरून तो फुटू नये. त्याने पिस्टनची वरखाली होणारी हालचाल बदलून गोल हालचाल सुरू केली. त्यामुळे हे वाफेचे इंजिन कारखान्यात तसेच पाणी उपसण्यासाठी वापरले जाऊ लागले. त्यानंतर मोठमोठे कारखाने स्थापन झाले आणि औद्योगिक क्रांती घडून आली.



जेव्हा विचारले फुलांना
तुमच्या आनंदाचे रहस्य ?
'देत रहावे' हा मंत्र आमचा
फुले एका स्वरात उत्तरली.

दिल्याने वाढते हे
मर्म आम्हांला उमगले
देत राहिलो म्हणून
ओंजळ पुन्हा भरलेली

रंग, गंध अन् मकरंद
ही आमची मिळकत
मधु सेवना येती भ्रमर
करती परागीभवन

फुलाफुलांनी सजते ओटी
फळे बहरती बहु मिठी
फुलपाखरे अन् पक्षी
तृप्त होती भरल्या पोटी

मर्म उमगले मग मजला
कळले एकूण सार
'देत रहा' हा धर्म बनावा
दोन होती चार

**विवेक पाथ्रुडकर**
संपर्क : ९४२०७०१३६०





मनोज बोरगावकर

# आपला आपला मार्ग..!



# कथा सद्‌गुणाची

लहानपणी सव्वीस जानेवारीला फार फार मजा यायची.... आताही येतेच पण तेव्हाची बातच काही और होती. पताकांनी सभोवार सजला जायचा.... आताही पताका असतातच पण बरीच जागा रंगीबेरंगी फुग्यांनी व्यापलेली असते. तेव्हाही फुगे होतेच.. रात्री तोंड दुखेपर्यंत फुगे फुगवायचे आणि उठेपर्यंत बरेचसे फुगे फुस्स होऊन जायचे.... आता या फुग्यांची जागा गॅसच्या फुग्यांनी घेतली.... नवीन नवीन हे फुगे आले तेव्हा म्हातारे माणसं ओरडायची; फुग्याबरोबर उडून जाशील म्हणून. मलाही लहानपणी कितीतरी दिवस ही भीती वाटत राहायची.

आता तर सगळीकडे या फुग्यांची रेलचेल असते. वेगळे रंग आणि आकार घेऊन ती सभोवार सजवत असतात. या फुग्यांची एक गोष्ट आठवली. गोष्ट अमेरिकेत घडलेली आहे बरं का मुलांनो! एका शाळेजवळ एक फुगेवाला फुगे विकत होता....लाल, हिरवा, पिवळा, नारंगी. मुले ते फुगे घेत होती. आकाशात उडवत होती.... तो आकाशात झेपावला की टाळ्या पिटतं होती. हे बराच वेळ चालले होते. एक आफ्रिकन मुलगा किती तरी वेळापासून त्या फुगेवाल्याकडे आणि चेकाळणाऱ्या मुलांकडे पाहत होता. थोडी सामसूम झाल्यावर फुगेवाल्याजवळची गर्दी संपल्यावर तो त्याच्याजवळ गेला आणि म्हणाला, “काका तुमच्या काठीला लागलेला तो काळा फुगा द्याल का विकत... पण काका, तो काळा फुगाही... इतर फुग्यांसारखा आकाशात उंच उंच जाईल का हो?” फुगेवाला खूप अर्थपूर्ण हसला आणि म्हणाला, “बाळा, फुग्यांचा रंग अजिबात महत्त्वाचा नसतो; त्यात काय आहे हे महत्त्वाचे असते.... रंग वगैरे सगळं खूप कमी महत्त्वाचे.” त्याच्या त्या उद्‌गारानं तो मुलगा हरखून गेला. त्याने तो काळाच फुगा घेतला आणि आकाशात सोडून दिला. तो उंच उंच उडताना पाहून तो टाळ्या पिटायला लागला.

कायम लक्षात असू द्या मुलांनो रंग, जात, भाषा, वंश, धर्म यावरून तुमची गुणवत्ता ठरत नसते; तर तुमच्यातला कंटेंट अर्थात गुण मोलाचे असतात. ते जोपासले तर तुमच्या आकाशात उंच भरारी घेण्याला कोणी म्हणजे कोणी रोखू शकणार नाही. आता या सोबतच दुसरा प्रश्न येतो, आकाशात उंच उंच भरारी मारायला कसं शिकायचे.... यशाचा नेमका मार्ग कोणता. खरं सांगू मुलांनो अगदी काळजात ठेवावी ही गोष्ट... यशाचा मार्ग हा आपल्या आपल्या पद्‌धतीने आणि आपणच शोधायचा असतो. कसा ते आणखी एका छोट्या मुलाच्या किश्श्याने सांगतो.

एक पुजारी गाभाऱ्यात पूजा करत होता. तेवढ्यात तिथं एक छोटा मुलगा गेला... त्यालाही वाटलं की आपणही पुजाऱ्यासारखी लांबून पूजा करावी. मग पुजाऱ्याने हळद कुंकू टाकलं की तोही तशीच ॲक्शन करायला लागला, पुजाऱ्याने अक्षता टाकली - फुलं टाकली हाही तशीच ॲक्शन करायला लागला. पुजाऱ्याचे लक्षही याच्याकडे होते... त्याला राग यायला लागला


या मुलाचा की 'हा पोट्टा माझी नक्कल करतोय म्हणून!' शेवटी पुजाऱ्याने मंत्र म्हणायला सुरुवात केली... आणि हळूच या मुलाकडे पाहिलं... बघू आता याला कशी नक्कल करता येईल म्हणून कारण या छोट्याशा मुलाला थोडीच मंत्र पाठ असणार आहेत... नक्कल करतोस का! पुजाऱ्याने पाहिलं तर पुजारी मंत्र म्हणत होता तर हाही मुलगा ओठातून काही तरी पुटपुटत होता. पुजाऱ्याचा रागाचा पारा चढत गेला. त्याने पूजा संपवली, पोराजवळ आला आणि खेकसून म्हणाला, "काय रे तू माझी नक्कल करत होतास ना?" पोरगं घाबरून म्हणालं, "नाही नाही महाराज, मलाही पूजा करावीशी वाटतं होती म्हणून तुम्ही जे कराल तसंच करून मीही देवाची पूजा करीत होतो बास." पुजारी म्हणाला, "ते सगळं ठीक आहे रे, पण मी मंत्र म्हणत होतो.. तेव्हाही तुझी पुटपुट चालूच होती ना! तुला मंत्र थोडीच येतात?"

तो मुलगा म्हणाला, "बरोबर आहे पुजारी महाराज मला मंत्र थोडीच येतात. पण तुम्ही जेव्हा मंत्र म्हणत होता ना तेव्हा मी अ ब क ड इची संपूर्ण बाराखडी म्हणत होतो आणि देवाला सांगत होतो.. की देवबाप्पा सगळे मंत्र याच बाराखडीतून तयार झालेले आहेत ना.... मग तू काढून घे...म्हणजे माझे मंत्रही आणि पूजाही पूर्ण होईल!" किती छान मार्ग शोधून काढला ना त्या मुलाने. मित्रांनो आपल्या आपल्या यशाचा मार्ग आपल्यालाही असाच शोधून काढावा लागणार आहे त्या मुलाने शोधला तसा! शोधाल ना?

**संपर्क : ९८६०५६४१५४**

---

**शेजारच्या बरणीमध्ये कोणकोणते चॉकलेटं किती आहेत ते शोधा व लिहा.**








# आई-बाबा

दोन आपुली दैवते
आई-बाबा थोर जगी
त्यांच्यामुळेच येतसे
श्रेष्ठत्व आपुल्या अंगी

बाळांसाठी घेती कष्ट
सुसंस्कार सदा देती
छान शिक्षण देऊनी
आयुष्य हे घडविती

आहे माया त्यांची श्रेष्ठ
नाही गणती होतसे
आई-बाबा तुम्हांमुळे
जग आम्हां दिसतसे



महापुरुष घडले
आशीर्वाद बाबा आई
श्याम घडला जीवनी
फक्त होती त्याची आई




आई-बाबांची करू सेवा
त्यांना जीवन अर्पूया
त्यांच्यासाठी आपणही
चला जीवन देऊया

करा मुलांनो संकल्प
आई-बाबांना देऊ हर्ष
आनंदात घालवूया
येणारे प्रत्येक वर्ष

**सुभाष कवडे**
संपर्क ९६६५२२१८२२

लीला शिंदे



# सद्‌गुणी बाळ

एक दाट हिरवंगार जंगल होतं. त्या जंगलात अनेक प्रकारची झाडं होती. काही उंचच्या उंच. काही ठेंगणी, ठुसकी, डेरेदार काही नाजूक वेली वळणदार. काही छोटी छोटी गुच्छेदार झुडपं. चिमुकल्या रंगीबेरंगी फुलांनी रानटी झुडपं डौलानं डुलत होती. या जंगलातील झाडं फळाफुलांनी लगडली होती. जंगलात विविध प्रकारचे पशू, पक्षी, कीटक, किडे गुण्यागोविंदानं नांदत होती. या जंगलात सर्वांची आवडती गोष्ट होती ती म्हणजे सुंदर निळशार तळं. तळं म्हणजे पशुपक्ष्यांचं विश्रांतीचं, तहान भागवण्याचं, खेळीमेळीनं खेळण्याचं ठिकाण. तळ्याकाठच्या पशुपक्ष्यांच्या मेळ्यामुळं तळ्याच्या शोभेत आणिकच भर पडली होती. हिरव्याकंच झाडांचा, निळ्या निळ्या आकाशाचा, सूर्य आणि चंद्राचा जणू लखलख आरसा होतं हे तळं. तळ्याकाठी एक जुनं वडाचं भलं मोठ्ठं झाड होतं. त्या झाडावर अनेक पक्षी, कीटक, किडे अतिशय आनंदानं रहात होते.

पहाट झाली रे झाली, सूर्यानं आपली पिवळसर सोनेरी किरणं चोहीकडं उधळली की साऱ्या पशुपक्ष्यांत चैतन्य उसळायचं. पक्ष्यांच्या मधुर गुंजनानं सारं जंगल आनंदतरंगात बुडून जायचं. चिमण्यांची चिवचिव, बुलबुल थव्यांची सुमधुर सुरेल तान, पोपटांची लडिवाळ बोली, वानर हुप्प्यांची हुपहुप्पी. मधूनच एखाद्या हिंस्रप्राण्याची थरकाप करणारी... डरकाळी... जणू सर्व पशुपक्ष्यांचा हा सुसंवादच असावा.

या वडाच्या झाडावर अगदी एकाकी दाट फांदीत एक घुबड कुटुंब रहात होतं. घुबडाचं पोर त्या वडाच्या दाट पानाआडून तळ्याकाठचा मौजमस्तीचा मेळा बघत बसे. ते बघून त्या घुबड पोराला खूप हेवा वाटे. त्याची इच्छा असूनही तो त्या पक्षीमेळ्यात सहभागी होऊ शकत नव्हता. कारण एकदा काय झालं... हे घुबडपोर इतर पक्ष्यांसोबत खेळायला गेलं, पण झालं काय... त्याला सर्व जमा झालेल्या पक्ष्यांनी वाळीतच टाकलं, कारण काय तर म्हणे... कसा विचित्र दिसतो हा, अगदी कुरूप. काय ते गोलगरगरीत डोळे, काय ती बेढब चोच, काय तो आवाज कर्कश्श चित्कार! सगळ्यांनी त्याला धुत्कारलं.

एकदा काय झालं. घुबडपोर गेलं पोपटरावांसोबत खेळायला. पोपटराव म्हणतात कसे...

*"हिरवं हिरवं अंग माझं*
*मखमली मऊ मऊ*
*तुझं रूप किती कुरूप*
*मी कसा काय येऊ?"*

घुबडपोराला हे ऐकून खूप खूप रडू आलं. त्याला खूप दुःख झालं. घुबडपोर रडत रडत गेलं आईकडे थेट. घुबडपोर म्हणालं, "आई... आई पोपटराव म्हणतात मी... मी आहे कुरूप. आई आई कुरूप म्हणजे काय गं? " असा निरागस प्रश्न घुबडपोरानं आपल्या आईला विचारला. आई म्हणाली, "दिसण्यातच काही रूप नसतं, चांगले गुण, चांगलं वागणं यातच खरं अप्रूप असतं."

घुबडपोराला आईच्या उत्तरानं दिलासा मिळाला. त्याला जरा हुरूप आला. त्यानं ठरवलं आईनं सांगितल्याप्रमाणं आपण चांगलं वागायचं. खरं तर आपण तसंच तर वागलो होतो, तरीही पोपटरावांनी माझ्यासोबत खेळायला नकार

दिला. मला मित्र का नाही केलं? जाऊ दे... नाही तर नाही, अशी आपली मनाची समजूत काढून घुबडपोर गेलं बुलबुल पक्ष्याकडे. घुबडपोर म्हणालं बुलबुल पक्ष्याला,

*"बुलबुलराव बुलबुलराव*
*सुरेल तुमची तान*
*तुम्हीच या जंगलाची*
*आहात खरी शान"*

पण बुलबुलरावांनी घुबडपोरानं केलेल्या कोडकौतुकाकडे ऐकून न ऐकल्यासारखं केलं, अन् बुलबुलराव म्हणाले,

*"पाहता वाटते भीती*
*आवाज भेसूर किती*
*ओळख ना पाळख कुठले कोण?*
*नको दाखवू तुझं कुरूप तोंड."*

घुबडापोराला हे ऐकून खूप खूप रडू आलं. खूप वाईट वाटलं. आईनं सांगितल्याप्रमाणं चांगलं वागूनही काहीच फायदा झाला नव्हता... ही मंडळी मला का मित्र म्हणत नाहीत बरं? विनाकारणच मला का नाकारतात?

घुबडपोर खूप दु:खी झालं. तेव्हापासून घुबडपोरानं ठरवलं दिवसा आपण कधीच घराबाहेर पडायचं नाही. रात्रीच घराबाहेर पडायचं. रात्रीच्या काळ्यामिट्टं काळोखात घुबडपोराला चांगलं स्पष्ट दिसतं हे त्या मित्रांना काय माहीत? निसर्गानं त्याला ही अनमोल देणगी दिली आहे. दुसऱ्यांना कुरूप वाटणारे त्याचे ते भेदक डोळे हे काळ्याकुट्टं अंधाराला भेदू शकत होते. घुबडपोर उंच आपल्या घरटयातूनच जंगल मित्र... न.. न.. नाही नाही मित्र कसले शत्रूंची गंमतजंमत बघायचा. लांबूनच आनंद मानायला.

एके दिवशी काय झालं, रात्रीच्या काळोखात वडाच्या झाडावर पोपटराव आणि बुलबुलरावांच्या घरट्याजवळ काहीतरी सरपटतं चकाकलं. पोपटरावांचं कुटुंब आणि बुलबुलरावांचं कुटुंब गाढ झोपेत होतं. त्यांना कशाचाच थांग पत्ता नव्हता. त्यांच्या घरट्यातल्या मऊ मऊ पिलावळीवर हल्ला करायला एक भला मोठ्ठा साप चालला होता. घुबडपोरानं ते पाहिलं. आपल्या भेदक डोळ्यांना मिट्ट काळोखात अगदी स्पष्ट दिसलं. घुबडपोर दिसायला जरी कुरूप होतं पण मनानं होतं चांगलं, गुणी. त्यानं क्षणाचाही वेळ न घालवता, आपले मित्र की शत्रू असा विचार न करता त्या पोपटपिल्लांना,

'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस सर्व्हे नं. ४८, घर पट्टी नं. ४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे ४०० ६१२, येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक– कृष्णकुमार पाटील.

'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane- 400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune- 411 004 * Editor : Krishnakumar Patil.

बुलबुलपिल्लांना गट्टम करण्यासाठी आलेल्या सापावर अचूक झडप मारली. घुबडआईनं आणि घुबडपोरानं मिळून सापाला जमिनीवर खाली पाडलं, आपटून ठार मारलं. मिट्ट रात्री अंधारात झाडाखाली जमिनीवर घनघोर युद्ध चाललं होतं. दोघा मायलेकानं हिंमतीनं त्या सापाला ठार मारलं.

वडाच्या झाडावरच्या पक्ष्यांना थोडी जाग आली होती. काही तरी अघटीत घडतं आहे अशी चाहूल लागली होती. फक्त आवाजच त्यांना ऐकायला येत होता झटापटीचा, पण दिसत मात्र काही नव्हतं काळोखात. पोपटराव पोपटीनबाई, बुलबुलराव आणि बुलबुलबाईचा आवाज भीतीनं खोल गेला होता, पंखाची फडफड करत पिलांना आपल्या पंखाखाली घेऊन प्रेमानं गोंजारीत होते, कुशीत धरून बिलगून बसले होते. पोपटराव, बुलबुलराव सावध झाले होते.

पहाट झाली. चोहीकडे तांबडं फुटलं होतं. पक्ष्यांच्या मधुर किलबिलीनं सारं जंगल जागं झालं होतं. सूर्याची कोवळी किरणं चौफेर पसरली होती. छोट्या मोठ्या झाडाझुडपांवर, वेलींवर सोनेरी चैतन्य झळकत होतं. निळ्या निळ्या तळ्यात सूर्यकिरणं झिलमिल झिलमिल तरंगत होती. प्रसन्न नव्या दिवसाचं स्वागत करीत वारं जंगलभर हुंदडत होतं. आजचं सोनेरी चैतन्य काही औरच होतं. नव्या मैत्रीचा संदेश घेऊन आलेली ही सोनेरी पहाट होती. कालरात्रीच्या 'काळरात्रीतून' आपल्या लाडुल्या, गोडुल्या, सोनुल्या पिलांची सुटका करणारं दुसरं तिसरं कुणी नसून तेच ते कुरूप पण सद्गुणी घुबडबाळ होतं. सर्व पक्षी मिळून घुबडआई आणि घुबडपोराकडे गेले. त्यांनी त्यांची माफी मागितली. घुबडआई म्हणाली, "कसली माफी? आपण एकत्र रहातो एका झाडावर. आपल्या झाडाचं म्हणजेच घरट्याचं संरक्षण केलं आम्ही बरं का! पक्षी मित्रांनो, नुसतं देखणं रूप म्हणजे सर्व काही नाही. खरं रूप तर आपल्या वागण्यातून, आपल्या सद्गुणातून दिसायला हवं. माझ्या पोराचा मला अभिमान वाटतो. त्यानंच सापाला पाहिलं अन त्याच्यावर हल्ला केला. आपली बाळं, घरं सुखरूप राहिली. बरं का मित्रांनो, निसर्गानं आम्हांला भेदक डोळ्यांचं वरदान दिलं आहे, ज्यामुळे काळ्याकुट्टं अंधारातही आम्हांला स्पष्ट दिसतं. म्हणूनच आम्ही सापाला मारू शकलो. माझं घुबडबाळ सद्गुणी बाळ आहे, त्यानं तुमचा राग मनात नाही धरला. मी त्याला सांगितलं, कुणी कसं ही वागो आपण चांगलंच वागायचं. तुम्ही उगाचच माझ्या पोराचं मन दुखवलं. त्याला तुम्ही मित्र म्हणून फार आवडता. तुम्ही त्याला खेळायला सोबत घ्याल का?" सर्वांना हे ऐकून खूप खजील झाल्यासारख वाटलं. त्यांना आपली चूक कळली. त्यानी सर्वांनी मनापासून माफी मागितली आणि म्हणाले, "घुबडबाळ हा खरा गुणवंत, रूपवंत आहे. त्यानं आमच्या चिमुकल्यांचे प्राण वाचवले. आम्हांला त्याचा अभिमान वाटतो. खरं रूप हे दिसण्यात नाही तर वागण्यात असतं हे सद्गुणी घुबडबाळामुळं समजलं." तेव्हापासून सर्व पक्षी घुबडबाळासोबत खेळीमेळीनं खेळू लागले.

**संपर्क** : ९४२१६८८५७६

# कुतूहल

अमित डहाणे, ९४२१०५०३८८

'किशोर' मित्रांनो, 'किशोर'मार्च २०२३ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ एप्रिल २०२३ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

## Q&A

**१) अलीकडेच भूकंपामुळे कोणत्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली?**

१) भारत व पाकिस्तान २) जपान व चीन
३) तुर्की व सिरीया ४) ब्रिटन व इराण

**२) भारतात सर्वात अधिक हत्ती अभयारण्ये कोणत्या राज्यात आहे ?**

१) महाराष्ट्र व केरळ २) मध्यप्रदेश व छत्तीसगड
३) कर्नाटक व आंध्रप्रदेश ४) तामिळनाडू व आसाम

**३) स्वतंत्र भारतात जन्मलेल्या भारताच्या पहिल्या राष्ट्रपती कोण आहेत ?**

१) प्रतिभाताई पाटील २) तारा देवी
३) द्रौपदी मुर्मू ४) कॅ. लक्ष्मी सहगल

**४) भारतातील सर्वात लांब राष्ट्रीय महामार्ग कोणता आहे ?**

१) वाराणसी – कन्याकुमारी २) मुंबई–आग्रा
३) नागपूर– कोलकत्ता ४) मुंबई – गोवा

**५) महाराष्ट्रातील कोणता जिल्हा 'पहिला पर्यटन जिल्हा' म्हणून घोषित करण्यात आला होता ?**

१) औरंगाबाद २) पुणे
३) सिंधुदुर्ग ४) रत्नागिरी

**६) ९६ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या साहित्य नगरीचे नामकरण काय करण्यात आले होते?**

१) राष्ट्रपिता महात्मा गांधी साहित्य नगरी
२) विनोबा भावे साहित्य नगरी
३) प्रा. राम शेवाळकर साहित्य नगरी
४) कविवर्य सुरेश भट साहित्य नगरी

**७) कोणत्या खनिजाला व्हाईट गोल्ड असे म्हणतात?**

१) कोळसा २) चुना ३) लिथिनियम ४) लोह

**८) २०२२ चा 'विंदा करंदीकर जीवन गौरव' पुरस्कार कोणाला जाहीर झाला आहे ?**

१) चंद्रकुमार नलगे २) विठ्ठल वाघ
३) विजय खेडकर ४) रामचंद्र गुहा

**९) महिला क्रिकेट प्रीमियर लीगसाठी सर्वात अधिक बोली कोणत्या महिला खेळाडूला मिळालेली आहे?**

१) स्मृती मानधना २) हरमनप्रीत कौर
३) शेफाली शहा ४) जेमिना रोड्रिक्स

**१०) महाराष्ट्राचे नवीन राज्यपाल म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे ?**

१) रमेश बैस २) अबू चव्हाण
३) अनुसया उईके ४) बी. डी. मिश्रा

**११) पियूची वही या बालसाहित्याचा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त पुस्तकाच्या लेखिका कोण आहेत ?**

१) वीणा गवाणकर २) डॉ. संगीता बर्वे
३) सरिता वैद्य ४) सुधा मूर्ती

**१२) आदिवासी समाजाचा विश्वकोश तयार करणारे पहिले राज्य कोणते आहे?**

१) महाराष्ट्र २) ओडिशा ३) सिक्कीम ४) मध्य प्रदेश

**१४) कोणत्या दिवशी 'जागतिक कडधान्य दिन' साजरा करण्यात येतो ?**

१) १ जानेवारी २) १० फेब्रुवारी
३) १५ ऑगस्ट ४) २४ जून

**१५) 'आजी आजोबा दिवस' कोणत्या दिवशी साजरा करण्यात येतो ?**

१) १० सप्टेंबर  २) २४ फेब्रुवारी
३) १० मार्च  ४) २४ ऑगस्ट

**१६) २०२२ या वर्षीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार कोणाला जाहीर करण्यात आला आहे ?**

१) न्या. नरेंद्र चपळगावकर २) डॉ. बाबा आढाव
३) अप्पासाहेब धर्माधिकारी ४) न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी

---

## चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

## चित्रकोडे मार्च २०२३ उत्तरे




## कुतूहल : मार्च २०२३ ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) – ३ | ६) – २ | ११) – ३ |
| २) – ४ | ७) – २ | १२) – १ |
| ३) – ३ | ८) – ४ | १३) – ३ |
| ४) – ३ | ९) – ३ | १४) – १ |
| ५) – ४ | १०) – १ | १५) – २ |

## कुतूहल : फेब्रुवारी २०२३ – यशस्वी स्पर्धक

कु. साक्षी पाईकराव, कु. कुलबीर चव्हाण, कु. सुवीर फडे, कु. प्रणव दाभाडे, कु. स्नेहा राजपुरे, कु. उज्मा बागवान, कु. तन्मय देसाई, कु. स्वरूपा शिंदे

## चित्रकोडे : फेब्रुवारी २०२३ – यशस्वी स्पर्धक

- **पुणे –** कु. प्रणव दाभाडे, कु. अनिकेत भवार,
- **सातारा –** कु. श्रुती राजगे, कु. समीक्षा करे, कु. सुवीर फडे, कु. तन्मय देसाई, कु. सिद्धीका चौधरी, कु. प्रज्वल महांगडे, कु. आर्यन काटे, कु. सार्थक पवार, कु. स्नेहा राजपुरे, कु. अधिराज पाडळे, कु. हर्षदा साखरे, कु. सृष्टी भिलारे, कु. मुक्ता फाटक, कु. निखिल ठोंबरे, कु. सुश्मित साळवेकर, कु. अथर्व राजापुरे, कु. स्वानंद काटे, कु. अथर्व वनारसे, कु. स्वामी क्षीरसागर, कु. पूर्वा पवार, कु. श्रद्धा देशमुख, कु. उज्मा बागवान, कु. अशिष पाठक, कु. स्वयंम खराडे, कु. श्लोक नवघणे, कु. हर्षवर्धन धायगुडे, कु. प्रणव मल्लाडे, कु. प्रज्ज्वल घागरे, कु. श्रद्धा शिंदे, कु. अनुष्का इथापे, कु. आयेशा बागवान, कु. अनुष्का जाधव, कु. सई मांढरे, कु. जान्हवी कामटे, कु. विभावरी कळंबे, कु. समर्थ शेंडे, कु. चैतन्य सुतार, कु. अर्णव देशमुख
- **अमरावती –** कु. अश्विनी वानखेडे , कु. सुवर्णा वानखेडे, कु. किरण वानखेडे, कु. सपना बाकोडे, कु. काजल बाकोडे, कु. भूमिका बाकोडे, कु. संजना बाकोडे, कु. स्नेहल कोवाडकर, कु. आराध्या वानखेडे, कु. सुहास वानखेडे, कु. सोनू पाटील, कु. खुशी धंदरे, कु. गुरू धंदरे, कु. अनिकेत इंगळे, कु. चिराग धंदरे
- **ठाणे –** कु. रोहित भोईर, कु. दर्श वळवळकर,
- **मुंबई –** कु. अयांश कुलकर्णी, कु. चैतन्य बढे
- **बुलढाणा –** कु. रोहीत वानखडे, कु. वैष्णवी तायडे, कु. दिपाली सपकाळ,
- **जालना –** कु. रितीका शिंदे
- **सिंधुदुर्ग –** कु. किरण सावंत, कु. विराज झोरे, कु. आयुष नाईक, कु. गुंजन निंबाळकर, कु. विनय कांबळे, कु. दीक्षा गावडे, कु. आयुष नाईक, कु. उत्कर्ष परब, कु. धनश्री धुरी, कु. स्वयम सावंत
- **कोल्हापूर –** कु. पल्लवी रेडेकर,
- **रत्नागिरी –** कु. समर्थ पाटील, कु. सुमुख केतकर, कु. श्रीपाद चव्हाण
- **सोलापूर –** कु. प्राजक्ता गिराम,
- **नागपुर –** कु. निरजा कुलकर्णी
- **नाशिक –** कु. प्राची भवर, कु. श्रावणी भवर, कु. माहेश्वरी मोरे, कु. कावेरी जाधव, कु. ज्ञानेश्वरी पानसरे

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/- चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



मी इयत्ता तिसरीत शिकते. एके दिवशी शाळा सुटल्यावर मी घरी आले. मी जेव्हा घरामागे गेली. तेव्हा मला एक कोंबडीचे पिल्लू रस्त्यात आडवे पडलेले दिसले मी त्याला उचलले व पाणीही पाजले. ती कोंबडी तिच्या पिल्लाला शोधत होती. नंतर एका तासाने त्या पिल्लाला जाग आली. ते पिल्लू आजारी होतं. मी त्याला खायला थोडीशी बाजरी दिली. त्या पिल्लाने ती बाजरी खाल्ली. तेव्हा त्याला जरासे बरे वाटले. मी त्या पिल्लाच्या पायाकडे बघितले तर त्याच्या पायाला जखम झाली होती. मी त्याच्या जखमेवर औषधोपचार केले. ते पिल्लू जरासे उठू लागले, ते हळूहळू चालायला लागले. हे सर्व करून मला आनंद झाला व मी त्याला कोंबडीजवळ नेऊन सोडले. हे सर्व मी शाळेत गुरुजींना सांगितले. त्यामुळे त्यांनी माझे कौतुक केले.

**परीदी रामचंद्र सावले**
इ.तिसरी, जि.प.प्राथमिक शाळा,
चाफळ (मुली) तालुका पाटण, जिल्हा सातारा



आमची शाळा सुरू होती. मधली सुट्टी एक तासाची होती म्हणून मी व माझे मित्र शाळेच्या मैदानावर खेळत होतो. खेळता खेळता माझे लक्ष झाडाखाली पडलेल्या एका पक्ष्याकडे गेलं. तो जखमी अवस्थेत असलेला पोपट होता. लगेच मी त्याला हळूच उचलून थंड जागेत आणले. मित्राकडून माझी पाण्याची बाटली मागवून त्याला थोडे पाणी प्यायला दिले. त्याला थोडी माझ्याकडे असलेले पेरूचे खाप सुद्धा खायला दिले. त्याला थोडेसे बरे वाटले. त्याच्या जखमी पायाला मलमपट्टी केली. नंतर त्याला माझ्या घरी आणून ३ ते ४ दिवस त्याची सेवा केली. त्यामुळे त्याला खूप हायसे वाटायला लागले. तो माझ्याकडे उपकार केल्याच्या नजरेने पाहू लागला. नंतर त्याला मी अलगद हवेत सोडून दिले. मला थोडे वाईटही वाटले. जणू काही आमची खूप मैत्री होती असे मला वाटायला लागले. घरी आईवडलांनी माझी पाठ थोपटली व मला शाबासकीही दिली. 'मुक्या प्राण्यांवर दया करा. त्यांची सेवा करा.' या वर्गात दिलेल्या संदेशाची मी पुरेपूर अंमल बजावणी केली. एक चांगले कार्य केल्याचे मला सार्थक झाले. अजूनही तो दिवस मी विसरू शकत नाही.

**जैनम जीवन जैन**
द्वारा जीवन सुगनचंद अलीझाड, कालिका पार्क,
सिद्धेश्वर प्लाझा, ७ वा मजला, सिडको, नाशिक



मी इयत्ता आठवीत शिकतो. रविवारी मी मैदानावर खेळत होतो तेव्हा एक आजी रडत होत्या. मी त्यांच्या जवळ गेलो व त्याच्या रडण्याचे कारण विचारले. तेव्हा त्या म्हणाल्या की "मी रस्ता चुकले आहे. मला माझ्या मुलाकडे जायचे आहे." तेव्हा आजीला पत्ता विचारला. त्यांना पत्ता सांगता येईना. मग त्या म्हणाल्या, "माझ्याजवळ एक कागद आहे. त्याच्यावर माझ्या मुलाचा मोबाईल नंबर आहे." मी आजीला घरी घेऊन गेलो. आजीला पाणी व चहा दिला. वडलांच्या फोनवरून आजीच्या मुलाला फोन केला व आमच्या घराचा पत्ता सांगितला. आजीचा मुलगा आला व आजीला घेऊन गेला. माझ्या या कामासाठी सर्वांनी माझे कौतुक केले.

**कु. आदित्य अतुल गाढे**
श्रीकृष्णनगर हडके,
औरंगाबाद, गुरूकुल
ऑलिंपियाड स्कूल, औरंगाबाद



आमच्या घराशेजारी झाडावर चिमणीचे एक घरटे होते. त्या घरट्यातून एक चिमणीचे पिल्लू खाली पडले. त्या पिल्लाच्या पायाला लागून जखम झाली होती. मी त्या पिल्लाला हळूच उचलले. पिल्लाच्या पायाला मी थोडी हळद लावली व त्याला थोडा खाऊ दिला. त्याला थोडे पाणी पाजले. नंतर त्याला त्याच्या घरट्याजवळ सोडून दिले. त्याला व चिमणीला मदत म्हणून घरट्याजवळ पाणी व धान्य यांची सोय करून ठेवली. तेव्हापासून चिऊताई व तिचे पिल्लू न घाबरता आमच्याजवळ येऊन धान्य खाऊ लागली व छान-छान बागडू लागली. मला खूप आनंद झाला. हे सर्व मी माझ्या शिक्षकांना सांगितले. त्यांनी मला शाबासकी दिली. माझ्या आई-वडलांनी माझे खूप कौतुक केले.

**कु. साक्षी शंकर पाईकराव**
इ. पाचवी, जि.प.प्रा.शाळा,
रांजणगाव (शें.पू.),
रा. रांजणगाव, पोस्ट. धानेगाव,
ता.गंगापूर, जि. औरंगाबाद



नेहमीप्रमाणे मी शाळेत चाललो होतो. माझा मित्र सिध्देश व अजय आम्ही सोबत जात होतो. तेवढ्यात रस्त्याने जाणारी एक गाडी अतिशय वेगाने आमच्या दिशेने येत होती ते पाहून मी सिध्देश व अजय यांना ओरडून हाताने रस्त्याच्या बाजूला ओढले. गाडी त्याच वेगात निघून गेली व होणार अपघात टळला. झालेली सर्व हकीकत मी आमच्या सरांना सांगितली. सरांनी मला शाबासकी दिली. मला खूप आनंद झाला.

**समर्थ समाधान जाधव**
४ थी, जि.प.
प्रा. शाळा पुरी,
ता. चांदवड,
जि. नाशिक

उमलती प्रतिभा

## आई

ती अंदाजाने मसाला
चिमूटभर मीठ टाकते
आईच्या हाताचं जेवण
नेहमीच परफेक्ट लागते

कुकरच्या तीन शिट्या
तिलाच ऐकू जातात
उलाथण्याशिवाय पोळ्या
हाताने उलटता येतात

सिरियल पाहत पाहत
भरभर भाजी चिरते
कोशिंबीर चटणी ठेचा
सोबत भाजी सुद्धा करते

सगळ्यांच्या आवडीचं
रोज काही न काही
वाफाळलेलं प्रेम तिचं
अन्नपूर्णा असते आई

**कु. पल्लवी जोतिबा रेडेकर**
विद्या मंदिर मनवाड,
मु. पो. मनवाड, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर

## गाव

*एक होते गाव*
*लहान नसे ते खेडेगाव*

*गावात होती माणसं*
*शेतात होती कणसं*

*कणसं होती दाणेदार*
*दाणे होते रसदार*

*माणसं गेली बाजारात*
*कणसं विकायच्या दुकानात*

*माणसाने घेतली फळे*
*सोबत होती फुले*

*फळे होती चवदार*
*फुले होती रंगतदार*

*फळे खाऊन माणसे तृप्त झाली*
*फुलांच्या सुवासाने प्रसन्नता आली*

***धनश्री भगवान धुरी***
जि.प.पूर्व प्राथमिक केंद्र शाळा,
शेर्ले नं १, मु.पो. शेर्ले नागधुरीवाडी,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

# स्नेहाची युक्ती

एक गाव होते. त्या गावात स्नेहा नावाची मुलगी राहत होती. ती अत्यंत हुशार व स्वाभिमानी होती. ती इयत्ता चौथीत होती. स्नेहाचे कुटुंब अत्यंत गरीब होते. त्यांची अत्यंत गरिबीची परिस्थिती होती. तिच्या आईचे नाव कमलाबाई असे होते. तिच्या वडलांचे नाव मोहन होते. तिच्या भावाचे नाव चिंटू होते. तिचे आईवडील शेती करून पोट भरायचे. शेती हाच त्यांचा व्यवसाय होता. ते शेती करून बाजारात भाजीपाला विकायला जायचे. काही दिवसांनी तिला दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या होत्या.

एके दिवशी ती फिरता फिरता मिठाईच्या दुकानाजवळ थांबली. दुकानदार म्हणाला "ए मुली, तू माझ्या मिठाईचा वास घेतलास त्याचे मला पैसे हवे." मग बाजारात असलेले लोक मिठाईच्या दुकानाजवळ जमा झाले. तिला काही सुचेना मग तिला एक युक्ती सुचली. ती म्हणाली, "हो... आणते ना दुकानदार काका." असे म्हणून ती आईकडे गेली. आईला स्नेहा म्हणाली, "आई मला चिल्लर पैशांची पिशवी दे." आई म्हणाली, "स्नेहा, तुला पिशवी कशाला हवी आहे?" स्नेहा म्हणाली, "आई, तू पण चल." आई व स्नेहा मिठाईच्या दुकानाजवळ गेले. आई म्हणाली, "स्नेहा, तू मला इथे का आणले?" स्नेहा म्हणाली, "माझे एक काम आहे." स्नेहाने आईच्या हातातून पिशवी घेतली आणि पिशवीमधले चिल्लर पैसे दोन-तीनदा वाजवले. दुकानदार म्हणाला, "ए मुली, मला चिल्लर पैशांचा आवाज नको मला पैसे हवे." स्नेहा म्हणाली, "अहो दुकानदार काका, मी तुमच्याकडून काय घेतले, मिठाईचा वास, मग त्याची किंमत काय चिल्लर पैशांचा आवाज." मिठाईवाल्या काकांना स्नेहाची युक्ती कळेना. स्नेहा परत दुकानदाराला म्हणाली, "अहो दुकानदार काका, मी इथे उभे राहून काय घेतले? मिठाईचा वास. मी तुमच्याकडून मिठाई घेतली नाही. मी फक्त मिठाईचा वास घेतला. मग त्याची किंमत काय? चिल्लर पैशांचा आवाज." बाजारातले लोक म्हणाले, "हा दुकानदार सर्वांशी असाच वागतो, पण या मुलीने दुकानदाराला चांगलीच अद्दल घडवली." दुकानदाराचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता. स्नेहा म्हणाली, "अहो दुकानदार काका आता तुम्हांला तुमच्या मिठाईच्या वासाचे पैसे मिळाले ना."

**कु. सामिनी संदीप गोसावी**
इ. ४ थी, तु. ड, प्लॉट नं ७४, संघमा चौक, रामनगर,
गोळीबार टेकडी, धुळे



**चि. श्लोक निलेश राजवाळ**
इयत्ता - तिसरी, जि.प. प्राथ. शाळा पढेगाव,
ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर



**कु. प्रेम सुनिल काळे,**
इ.-३री, तु.-अ, जि.प.प्रा.केंद्र शाळा राजापूर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर



**कु. मनस्वी कैलास म्हशीलकर**
इ.४ थी, जि.प.शाळा म्हासळा नं १,
ता. म्हासळा, जि. रायगड


पाठलाग
घनश्याम देशमुख
संपर्क ९८२३४१३६२९
ते बघ तिथे दोघे जण...
आता हे कोण? डोक्यावर पोतं घेऊन चाललयं
आपल्या गावातले असतील. चल आवाज देऊ...
थोडं थांब!
का काय झालं?
ते दोघे रस्ता चुकल्यासारखे बघताहेत. ते गावाकडचे नाहीत.
असूदे... त्यांना त्या माणसाबद्दल सांगू या.
ते त्याचेच सोबती वाटताहेत. तो फोनवर बोलतोय.



काय झालं!
या जंगलात नेटवर्क नाही त्यामुळे त्या रामसिंगशी संपर्क होत नाही. कसं शोधायचं त्याला ?
मग हे जड पोतं खाली टाकू का?
नको नको, मूर्खा त्यातल्या वस्तू तुटल्या ना तर...
तो रामसिंग आणि बाजीराव आपले हात पाय तोडून ठेवतील. समजलं?
त्या पोत्यातून लोखंडी वस्तू आणि घंटेचा आवाज येतोय.
तुझ्या गाईच्या गळ्यातील घंटा का?
नाही. मोठ्ठी घंटा, जशी देवळातली...
असं किती वेळ मी उभं राहू पोतं घेऊन?
काय करायला आली असतील ही लोकं या जंगलात?
क्रमशः



# आम्ही सगळे वाचक

पुस्तकं आहेत मित्र आमुचे, आम्ही सगळे वाचक
नदी किनारी हिरवे डोंगर
तुडवत आम्ही असतो
कुठे निसरड्या वाटेवरती
आम्ही घसरून पडतो
असे दंगतो पानोपानी, विसरून तहान भूक

थोर महात्मे, चरित्र त्यांचे
आम्हां करते थक्क
राजा, राणी, पऱ्या, देवता
दिसती आम्हांस लख्ख
कुठे जादूगार, कुठे राक्षस, करतो आम्हां अवाक

बसून जहाजावरती जातो
सागरमार्गे, दूर देशी
कधी घालते विमान घिरट्या
नेते उंच आकाशी
कधी हसवते कधी रडवते, गोष्टीमधले कथानक



नकोत आम्हां खूप खेळणी
नको जास्तीचा खाऊ
एक नवे, पुस्तक द्या आणून
वाचून ज्ञानी होऊ
उत्तम माणूस होण्यासाठी, उत्तम वाचा पुस्तकं



अशोक कोतवाल
संपर्क : ९८५०११७५३९

# इंग्रजी विभाग


Let us all express our feelings of gratitude,
Let's be thankful without having attitude
To all those who teach, talk and play,
They are the ones making our day.

Our parents teach us to walk and talk,
Yeah, they are the real ones who absolutely rock
They are the only ones who help us in need,
They are our bestest friends, indeed.

We can't forget about our friends,
It gets boring when the school hours end
School talks can't go away without the teacher,
Teaching students like us is truly a feature.

Let us all express our feelings of gratitude,
Let's be thankful without having attitude
To all those who teach, talk and play,
They are the ones making our day.

**Aaditya Bartakke**
Contact : 7710038339



Umashankar Devadhe



# The Golden Shoes...

There lived a farmer. His name was Vithoba. Vithoba was hardworking, sincere, and honest. He used to get up early to go to the field and would take care of his cows, bullocks, and other animals. He would also guard the crops grown in the field. One day, as part of his routine, he was going to the filed early in the morning. It was winter season. It was foggy. Shining dew drops had settled on the leaves of the shrubs and trees. Vithoba, in his warm clothes was moving towards the field.

He suddenly stopped as he saw something moving behind the mango tree. He went closer. He was not sure what it was. To his surprise, a small dog was shivering with cold and was groaning in pain. The poor little dog was injured and his right paw was swollen. Vithoba was a kind man. He felt bad and immediately picked up the dog and took it to the field. He made a nice warm shelter for the dog and nursed its injury. Every morning, he would unfailingly bring stale chapatis from home and feed the dog. It became his daily routine. In a weeks' time, the dog became healthy and agile. Vithoba was happy to see the speedy recovery of the dog. One day the happy dog striked a conversation with Vithoba. ' You were very kind to me. Had you not picked me on that wintry morning, I would not have survived. As a token of gratitude kindly accept this small gift from me'. Vithoba was surprised! He politely refused to accept a gift offered by the dog. After a lot of pleading from the dog, Vithoba finally accepted it. The gift was nothing but a torn pair of shoes. Initially, Vithoba was unwilling to wear those shoes as they were tattered. But he didn't show any displeasure on his face. He carried them home.

The next morning, to his surprise, those tattered shoes turned into bright and shining golden shoes. Vithoba couldn't believe his eyes. He was overjoyed and stared at those shoes in disbelief. He had become rich now. He was lost in his thoughts considering what he could do with this gold. His prepared a long list of the costliest and choicest items he had desired to buy. A lot of promises were made to his wife and children. The next few days, Vithoba spent in thinking



about the Golden Shoes. He kept them in the cupboard. He would go and check them every day.

Days passed by. Vithoba's routine had completely changed. He didn't bother to feed the dog. He hardly visited the dog. One day, he went to the shelter. To his dismay, the dog was not at its place. Vithoba searched high and low. He called out loudly and searched the entire neighbourhood. But he failed to find him. Almost in tears, he sat at one place for a long time. He regretted his laziness after getting the golden shoes.


Slowly, he came back to the house. As part of his routine, he went to check the shoes kept in the cupboard. He was shocked and couldn't utter a single word when he saw those shoes. Those golden shoes had turned back to the normal leather shoes, and looked as tattered as they were before. He had realised his mistake but it was too late…


**Contact : 9823541160**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Refer these pictures to draw pictures in triangle shapes**






Count the number of bricks in each pile. Write in the boxes provided.

# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.


२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ एप्रिल २०२३.

३) कोड्याचे उत्तर मे २०२३ च्या अंकात प्रसिद्ध होईल.


४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.03.2023 Posting on 27th & 28th March 2023
License to Post without prepayment of postage No. WPP-53








कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा

**लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकाच्या चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित 'निवडक किशोर'चे १४ खंड**



किंमत प्रत्येकी ₹ १६३/- (30% सूट)



वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ १६००/-

किशोर

If not delivered please return to :
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,